

# न्यायालयीन प्रकरणे कशी हाताळावीत

## - मार्गदर्शिका-

सरकारी व निमसरकारी अधिकारी, पोलीस अधिकारी, विभागाचे लॉ ऑफिसर्स, लीगल ऑफिसर्स, कर्मचारी यांचा व कुणाही जिज्ञासू चा न्यायालयातील मार्गदर्शक


**लेखक**

**ॲड. नहुष खुबाळकर**


मा. न्यायमूर्ती श्री भूषण गवई,
मुंबई उच्च न्यायालय, यांच्या प्रस्तावनेसह

# न्यायालयीन प्रकरणे कशी हाताळावीत

## -मार्गदर्शिका-

### सरकारी व निमसरकारी अधिकारी, पोलीस अधिकारी, विभागाचे लॉ ऑफिसर्स, लीगल ऑफिसर्स, कर्मचारी यांचा न्यायालयातील मार्गदर्शक

**<u>लेखक</u>**

**ॲड. नहुष खुबाळकर**

**मा. न्यायमूर्ती श्री. भूषण गवई,**

**उच्च न्यायालय, यांच्या प्रस्तावनेसह**

- **पुस्तकाचे नाव:**
  **न्यायालयीन प्रकरणे कशी हाताळावीत: मार्गदर्शीका**
  **सरकारी व निमसरकारी अधिकारी, लॉ ऑफिसर्स, लीगल ऑफिसर्स, पोलीस अधिकारी, सरकारी कर्मचारी यांचा न्यायालयातील मार्गदर्शक**
- **आवृत्ती : पहिली**
- **सन : 2014**


- Copyright © 2014 - Adv. Nahush Khubalkar
  All Rights reserved with the Author

- All rights reserved. No part of this publication may be reproduced, distributed, or transmitted in any form or by any means, including photocopying, recording, or other electronic or mechanical methods, without the prior written permission of the author, except in the case of brief quotations embodied in reviews and certain other noncommercial uses permitted by copyright law. For permission requests, write to the author, addressed at the address below.



- Adv. Nahush S. Khubalkar
  69, Old Nandanvan Layout,
  Nagpur - 440009

- Email: nahushkhubalkar@gmail.com



- Price : Rs. 100/- Hard Copy
  Rs. 70/- Soft Copy http://imojo.in/lawebookmarathi


**डिस्क्लेमर**

या पुस्तिकेतील मार्गदर्शन म्हणजे कायदेशीर सल्ला नव्हे. ते सर्वसाधारण परिस्थितीमध्ये जनरल मार्गदर्शन आहे. प्रत्येक न्यायालयीन प्रकरणातील आपले धोरण प्रकरणपरत्वे वेगळे राहू शकते. प्रकरणपरत्वे, त्या त्या परिस्थितीनुसार आपल्या वकिलांच्या सल्ल्याने वा वरिष्ठांच्या मार्गदर्शनाने वागावे.

तसेच या पुस्तिकेत केलेल्या मार्गदर्शनामध्ये अचूकता राखण्याचा पूर्ण प्रयत्न केलेला आहे. तरीसुद्धा अनवधानाने काही त्रुट्या राहण्याची शक्यता नाकारता येत नाही. या पुस्तिकेतील मार्गदर्शनाच्या आधारे केलेल्या कृतीच्या परिणामास लेखक कुठल्याही प्रकारे जवाबदार असणार नाही.

***Dedicated to***
***The memory of my late father***
***Adv. Shri Surendrakumar Khubalkar***
***Whose ideals and values***
***Always guide me at every step***

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| | मा. न्यायमूर्ती श्री. भूषण गवई यांच्या द्वारे प्रस्तावना | |
| | अ वर्ड फ्रॉम गव्हर्नमेंट प्लीडर सौ. भारती डांगरे | |
| | लेखकाचे मनोगत | |
| **१.** | विषय ओळख | **13** |
| **२.** | चला चर्च बांधूया : काय आहे आपले व्हिजन | **18** |
| **३.** | न्यायालयीन प्रकरणे हाताळण्या बाबत मार्गदर्शक सुचना | **22** |
| **४.** | परिच्छेदनिहाय उत्तरे, म्हणजेच पॅरावाईज कॉमेंटस कसे तयार कराल | **34** |
| **५.** | न्यायालयात शपथपत्र (ॲफिडेव्हीट) करण्यापूर्वी | **44** |
| **६.** | अर्धन्यायीक, म्हणजेच क्वासी-ज्युडीशीयल अधिकार वापरताना...... | **47** |
| **७.** | बेल मॅटर मधे उत्तर तयार करताना..... | **51** |
| **८.** | - अवमान प्रकरणे - कंटेम्प्ट ऑफ कोर्ट च्या कारवाई बाबत | **55** |

# प्रस्तावना

**न्यायमूर्ती भूषण गवई**
न्यायाधीश,
उच्च न्यायालय, खंडपीठ नागपूर
दिनांक : ३१ जुलै २०१४

ॲड. श्री. नहुष खुबाळकर यांनी लिहिलेल्या " न्यायालयीन प्रकरणे कशी हाताळावीत - मार्गदर्शिका -" या पुस्तिकेची प्रस्तावना लिहितांना मला अतिशय आनंद होतो आहे. ॲड. श्री. खुबाळकर यांना ८ वर्षांचा खाजगी वकिलीचा त्याचप्रमाणे गेली १४ वर्षे उच्च न्यायालय, खंडपीठ नागपूर येथे सहाय्यक सरकारी वकील व सरकारी अभियोक्ता म्हणून काम करण्याचा प्रदीर्घ अनुभव आहे.

मी मुंबई उच्च न्यायालय, खंडपीठ नागपूर येथे सरकारी वकील व शासकीय अभियोक्ता म्हणून कार्य करीत असताना ॲड. श्री. खुबाळकर यांच्या सोबत 3 वर्षाच्या कालखंडामध्ये जवळून काम करण्याची संधी मला प्राप्त झालेली आहे.

ॲड. श्री. खुबाळकर हे अतिशय अभ्यासू वृत्तीचे व्यक्ती आहेत. आपण कार्य करीत असलेल्या कामामध्ये बारीक सारीक तपशिलाचे अध्ययन करून दक्ष राहण्याची त्यांची जिज्ञासू वृत्ती आहे. आपण कार्य करीत असलेल्या कामामध्ये ते स्वत:ला पूर्णपणे झोकून देवून हाती असलेल्या प्रकरणाची तपशीलवार मीमांसा करून न्यायालयीन प्रकरणे सुयोग्य रीतीने हाताळण्यामध्ये त्यांचा हातखंडा आहे.

सरकारी अभियोक्ता म्हणून गेली १४ वर्षे कार्य करीत असताना ॲड. श्री. खुबाळकर यांना जो प्रदीर्घ अनुभव प्राप्त झाला आहे त्या अनुभवाचा उपयोग करून त्यांनी न्यायालयीन प्रकरणे शासकीय अधिकाऱ्यांनी कशी हाताळावीत याची अतिशय योग्य रीतीने मांडणी केलेली आहे. त्यांनी लिहिलेल्या पुस्तिकेची भाषा ही अतिशय सोपी व स्पष्ट आहे. त्यांनी लिहिलेली पुस्तिका ही कुठल्याही व्यक्तीला, मग तो उच्चाधिकारी असो वा कारकून प्रवर्गातील कर्मचारी असो अशा कुणालाही समजेल अश्या साध्या व सोप्या पद्धतीने लिहिण्यात आलेली आहे. पुस्तिकेतील विषयांची ओळख करून दिल्यानंतर त्यांनी न्यायालयीन प्रकरणे हाताळताना ज्या विविध बाबींची अडचण येते त्या विविध बाबींचे जसे ईंस्ट्रक्शन्स देणे, पॅरावाईज कॉमेंटस् तयार करणे, न्यायालयात शपथपत्र दाखल करण्यापूर्वी घ्यावयाच्या खबरदाऱ्या व इतर विषयांची प्रकरणानुसार तपशीलवार सुयोग्य रीतीने मांडणी केलेली आहे.

लेखकाने आपले “व्हिजन” कसे असावे हे या पुस्तिकेतील प्रकरण क्रमांक दोन मधील एका छोट्या प्रसंगाद्वारे अतिशय सुंदर व कल्पक रीतीने मांडले आहे.

तसेच या पुस्तकातील प्रकरण क्रमांक ६, “अर्धन्यायिक, म्हणजेच क्वासी-जुडीशीयाल अधिकार वापरताना” या प्रकरणामध्ये अधिकाऱ्याला न्यायाधीशसदृश वागणे व संपूर्ण प्रक्रिया न्यायालयीन प्रक्रीयेसदृश पार पाडणे अपेक्षित असते व सरतेशेवटी निर्णय देऊन दोन पक्षांमधला वाद निकाली काढावयाचा असतो अशा प्रकारे विवेचन करून फार सुंदरपणे नमूद केले आहे.

लेखकाने सरकारी व निमसरकारी अधिकारी, लॉ ऑफिसर्स व लीगल ऑफिसर्स यांना शक्य असेल तर प्रकरणामध्ये तडजोड

करावी अशी सूचनाही दिलेली आहे.

भारतीय लोकशाहीचे, विधिमंडळ, कार्यपालिका व न्यायपालिका हे महत्वाचे स्तंभ आहेत. या देशातील नागरिकांना न्याय मिळणे हा त्यांचा मुलभूत हक्क आहे. सरकारी व निमसरकारी अधिकारी, लॉ ऑफिसर्स व लीगल ऑफिसर्स ज्या न्यायालयीन प्रकरणात न्यायालयात त्यांच्या तर्फे बाजू मांडतात त्या प्रकरणामध्ये त्यांचे स्वत:चे काही हितसंबंध नसतात. शासनाची बाजू मांडताना योग्य तो न्याय झाला पाहिजे याबाबत त्याची आग्रहाची भूमिका अपेक्षित असते. सरकारी व निमसरकारी अधिकारी, लॉ ऑफिसर्स व लीगल ऑफिसर्स हे “ॲडव्हर्सरी लिटीगंट” नसतात. जर सरकारी अधिकाऱ्यांनी न्यायालयीन प्रकरणांमध्ये कायद्याला अनुरूप बाबींचे अंगीकरण केले तर अनेक प्रकरणे न्यायालयात येण्यापासुनच थांबविल्या जावू शकतात. सरकारी व निमसरकारी अधिकारी, लॉ ऑफिसर्स व लीगल ऑफिसर्स यांनी न्यायालयीन प्रकरणे हाताळताना “ॲडव्हर्सरी लिटीगंट” म्हणून नव्हे तर न्यायपूर्ण निर्णय झाला पाहिजे ही खुणगाठ मनात बांधून जर प्रकरणे हाताळली तर न्यायपालिकेला निश्चितच खऱ्या अर्थाने न्यायदान करताना त्यांची मोलाची मदत होवू शकेल.

ॲड. श्री. खुबाळकर यांनी लिहिलेली ही पुस्तिका निश्चितच सरकारी व निमसरकारी अधिकारी, लॉ ऑफिसर्स, लीगल ऑफिसर्स, पोलीस अधिकारी व सरकारी कर्मचारी यांना अतिशय मोलाचे मार्गदर्शन करणारी ठरेल व खऱ्या अर्थाने न्याय झाला पाहिजे अशी कर्तव्याची भावना मनात रुजवून त्या करीता त्यांना प्रेरित करेल ही अपेक्षा या प्रसंगी करणे चुकीचे ठरणार नाही.

ॲड. श्री. खुबाळकर यांचे या प्रसंगी कौतुक करताना त्यांच्या

सुविद्य अर्धांगिनी सौ. दीप्ती खुबाळकर यांचा या प्रसंगी जर उल्लेख केला नाही तर ते योग्य होणार नाही.  त्या स्वत: विधीज्ञानक्षेत्रात आपली मोलाची कामगिरी पूर्ण करीत असताना त्यांनी श्री. नहुष खुबाळकर यांना केलेल्या मोलाच्या सहकार्याचा उल्लेख या प्रसंगी अगत्याने करावा लागेल.

अॅड. श्री. खुबाळकर यांनी लिहिलेल्या या बहुआयामी सुंदर पुस्तीकेबद्दल मी त्यांचे अभिनंदन करतो व ही पुस्तिका महाराष्ट्र राज्यातील सर्व सरकारी व निमसरकारी अधिकारी, लॉ ऑफिसर्स व लीगल ऑफिसर्स, पोलीस अधिकारी व सरकारी कर्मचाऱ्यांना मोलाचे मार्गदर्शन करणारी ठरेल ही अपेक्षा व्यक्त करतो.

**न्या. भूषण गवई**
मुंबई उच्च न्यायालय,
खंडपीठ नागपूर
३१ जुलै २०१४

# Office of Government Pleader, High Court of Bombay, Nagpur Bench, Nagpur

The Government or the Public body represents public interest and whoever is in-charge of running their affairs, is no more than a trustee or a custodian of the public interests. The protection of the public interest to the maximum extent and in the best possible manner is the primary duty of the state government. In Courts the said duty is discharged by the Government with the assistance of the Government Pleader / Assistant Government Pleader / Additional Public Prosecutor.

The Public Prosecutor has a very important role to play in the administration of Justice. He has at all times to ensure that an accused is to be tried fairly. His acts should always serve and protect the public interest. The State being a Prosecutor, the Public Prosecutor carries a primary position.

Though, the primary duty of a Public Prosecutor is to ensure that an accused is punished, his duties also extend to ensure fairness in the proceedings and also to ensure that all relevant facts and circumstances are brought to the notice of the court for a just determination of the matter, so that due Justice prevails.

The Government Counsel acts as an Officer of the Court and also discharges his the duty to the government who is his client and he pursues the

case given to him with the best of his ability. While doing so, he has to depend on the Government Officer for effectively briefing him and giving him the necessary input. The Government Counsel has to strike a balance effectively while acting as an Officer of the Court and also representing the Government, which function he cannot perform without effective assistance from the government officers.

The book written by Adv. Nahush Khubalkar, who has experience of more than a decade as a Government Counsel, would provide great insight into this special relationship of Client and his Counsel. The book gives minute details of how to respond to communication from the Government Counsel; how to prepare para-wise comments; what cares and precautions be taken before swearing affidavit; care to be taken while discharging quasi-judicial functions; dealing with Contempt Petitions etc.

I am sure the book will prove to be a constant companion and a Reference Manual to all the officers. I am extremely happy to be associated with the publication of the book during my tenure as a Government Pleader, and wish the same a great success.

Nagpur
31-7-2014

Bharthi Dangre
Government Pleader,
Bombay High Court,
Nagpur Bench, Nagpur

# लेखकाचे मनोगत

२३ वर्षांपासून मी उच्च न्यायालयात वकीली व्यवसाय करीत आहे. त्यातील मागील १४ वर्षांपासून उच्च न्यायालयात सहाय्यक सरकारी वकील व अतिरिक्त सरकारी अभियोक्ता या पदांवर कार्यरत आहे.

हे कार्य करताना अनेकदा असे जाणवले की सरकारी अधिकाऱ्यांना, न्यायालयीन प्रकरणे कशी हाताळावीत याचे मार्गदर्शन नसते. परिणामी मा. न्यायालयाची नाराजी ओढ्विते व नामुश्कीची वेळ येते.

हे सर्व टळावे ह्या उद्देशाने छोटीशी का होईना, पुस्तिकेच्या रुपात, शासकीय अधिकाऱ्यांना नेहमी रेफर करता येईल अशी एक मार्गदर्शीका तयार करण्याचा माझा मानस होता.  परंतु वेळेअभावी त्यास मूर्त स्वरूप देणे शक्य झाले नाही.  आज तो योग जुळून आला आहे. व ही मार्गदर्शिका आपल्या हातात उपलब्ध करून देताना अतिशय आनंद होतो आहे.

उच्च न्यायालयातील माझ्या दीर्घकालीन अनुभवाच्या आधारावर ही पुस्तिका लिहिलेली आहे. त्यामधील मार्गदर्शन हे वरवर साधे भासत असले तरी अत्यंत महत्वाचे आहे. ह्या साध्या वाटत असलेल्या स्टेप्स जर अमलात आणल्या तर आपल्या न्यायालयीन प्रकरणे हाताळण्याच्या कार्यामधे बरीच सुसुत्रता येईल, असा मला विश्वास वाटतो.

ही पुस्तिका लिहीताना, व्यावहारिक उपयोगितेच्या दृष्टीकोनातून एकाच भाषेचा अडसर नं बाळगता इंग्रजी भाषेचाही वापर केलेला आहे. त्यामुळे पुस्तकाची उपयुक्तता वाढण्यास नक्कीच मदत होईल असा विश्वास वाटतो.

ही पुस्तिका जास्तीतजास्त निर्दोष करण्याचा प्रयत्न केला आहे. परंतु तरीही अनवधानाने काही दोष राहून जाण्याची शक्यता आहे. त्याबद्दल कृपया क्षमस्व. आपल्या काही सूचना असल्यास जरूर कळवा. आपला आभारी असेन.

**ॲड. नहुष खुबाळकर**
उच्च न्यायालय, नागपूर
दि. १ ऑगस्ट २०१४

# <u>ऋणनिर्देश</u>

मा. आदरणीय न्यायमूर्ती श्री. भूषण गवई साहेब, मुंबई उच्च न्यायालय, नागपूर खंडपीठ यांच्या समवेत उच्च न्यायालयातील सरकारी वकिलांच्या ऑफिसात, ते सरकारी वकील असताना, त्यांच्या टीममध्ये, स. सरकारी वकील म्हणून काही काळ कार्य करण्याची संधी मला लाभली. त्या सुवर्णकाळात त्यांच्याकडून मला बरेच काही शिकायला मिळाले. उच्च न्यायालयीन कामकाजाचा भरपूर अनुभव मिळाला. तो अनुभवच या पुस्तिकेच्या निर्मितेचा आधार आहे. आदरणीय सरांनी, त्यांच्या अतिशय व्यस्त शेड्युल मध्ये सुद्धा या पुस्तकाच्या हस्तलिखिताचे बारकाईने वाचन केले. मोलाच्या सूचना केल्या. पुस्तकाला सुंदरशी व प्रेरणात्मक प्रस्तावना लिहिली. त्यांचे आभार मानण्याकरिता माझ्याजवळ शब्द नाहीत. या सगळ्याबद्दल मी त्यांचा शतश: ऋणी आहे.

या पुस्तकामागील प्रेरणास्थान मा. (निवृत्त) न्या. अंबादास जोशी, यांचेसमोर, स. सरकारी वकील म्हणून कार्य करताना, जाणते अजाणतेपणे, न्यायालयातील जज्ज व वकील याशिवाय शिक्षक व विद्यार्थी असे एक वेगळे नाते आपोआप कधी तयार झाले ते कळलेच नाही. त्यांच्याकडून कितीतरी असंख्य गोष्टी मी आत्मसात केल्या. सरांचा मी अत्यंत ऋणी आहे.

पुस्तक लेखनास मी सुरवात केली त्यावेळी उच्च न्यायालयात सरकारी वकील म्हणून कार्यरत असलेले, व आजचे मा. न्यायमूर्ती नितीन सांबरे, यांनी दिलेल्या प्रोत्साहनाबद्दल व वेळोवेळी दिलेल्या पाठींब्याबद्दल त्यांना अनेक धन्यवाद.

माझ्या आजच्या टीमलीडर सौ. भारती डांगरे, सरकारी वकील, उच्च न्यायालय, नागपूर खंडपीठ यांच्या पाठींब्याबद्दल व या पुस्तकात एक छानशी शेयरिंग केल्याबद्दल मी त्यांना धन्यवाद देतो.

माझ्यावर प्रेम करणारे लॉ कॉलेजातील माझे शिक्षक प्रो. डॉ. श्री. किशोर महाबळ, (महाबळ सर) - ज्यांना मी 'पॉवरहाउस ऑफ मोटिव्हेशन' असे संबोधितो - यांचा, त्यांनी दिलेल्या स्फूर्तीबद्दल व पुस्तकाच्या निर्मितीसाठी अक्षरश: "टुमणे" लावल्याबद्दल, व ते पूर्णत्वास जाते आहे कि नाही याचा सतत पाठपुरावा केल्याबद्दल सरांचे मी पांग फेडुच शकत नाही.

माझे सहकर्मी व मित्र अॅड. श्री दीपक ठाकरे, अॅड. श्री विनोद ठाकरे यांनी वेळोवेळी केलेल्या सूचनांबद्दल, व वेळोवेळी दिलेल्या पाठबळाबद्दल मी त्यांचा आभारी आहे.

माझी भार्या सौ. दीप्ती जिच्या सहकार्यामुळे व प्रोत्साहनामुळे, व माझी काळजी घेण्यामुळे हे पुस्तक पूर्णत्वास गेले तिचा मी ऋणनिर्देश नं करणे हे कृतघ्नपणाचे ठरेल.

सरतेशेवटी (खरे म्हणजे सर्वात प्रथम!) त्या विधात्यास कोटी कोटी प्रणाम ज्याने हे छोटेसे कार्य माझ्याकडून करवून घेतले.

**अॅड. नहुष खुबाळकर**
उच्च न्यायालय, नागपूर
दि. १ ऑगस्ट २०१४

# 1

# विषय ओळख

दिनांक 26 नोव्हेंबर 1949. भारतीय इतिहासातील एक महत्वाचा दिवस. काय झाले या दिवशी?

"आम्ही भारताचे लोकांनी" स्वतःसोबत एक फार मोठ्ठी कमिटमेंट केली. आम्ही न्याय, स्वातंत्र्य, समता, बंधुता ही सर्व मुल्ये ज्या देशात नांदतात असा भारत देश घडविण्याचे, अशा राष्ट्रबांधणी चे स्वप्न पाहीले. व ते स्वप्न, भारतीय संविधानाच्या स्वरूपात, लेखी स्वरूपात नोंदविले.

त्या मध्ये न्यायाचा - सामाजिक, आर्थिक व राजकीय - देखील समावेश होता. असे स्वप्न केवळ कागदावरच राहू नये, व प्रत्यक्षात यावे म्हणून, भारतातील लोकांना न्याय मिळावा म्हणून स्वतंत्र न्यायप्रणालीची व्यवस्था केली. त्यामध्ये सुप्रीम कोर्ट, हायकोर्ट, ईतर न्यायालये स्थापन केली.

थोडक्यात काय तर आम्ही "रूल ऑफ लॉ" नेच म्हणजे कायद्याच्या राज्याने चालण्याचे ठरविले.

भारतीय संघराज्याची स्थापना, देशातील कायदेनीर्मिती, त्यांची अंमलबजावणी इथपासून तर न्यायालयीन आदेशापर्यंत राज्याच्या प्रत्येक कृतीला कायद्याची मर्यादा आहे. अशी कायदेशीर मर्यादा "आम्ही भारताचे लोक" यांनी भारतास स्वातंत्र्य मिळाल्यानंतर संविधानाच्या स्वरूपात स्वत:वर घातली.

आपल्या देशात कायद्याचे राज्य आहे. मनमानीचे नाही. कायद्याच्या राज्यामध्ये शासनाची प्रत्येक कृती, प्रत्येक आदेश, प्रत्येक

(C)Adv. Nahush Khubalkar

निर्णय हा कायद्याच्या तसेच संविधानाच्या कसोटीवर खरा उतरला पाहिजे. अशी कसोटी - असा कस - जेव्हा एखादा नागरिक शासनाविरुद्ध न्यायालयात केस दाखल करून गाऱ्हाणे मांडतो तेव्हा लागत असते. अशा प्रसंगी आम्ही कायद्याच्या कसोटीवर खरेच आहोत असे शाबित करणे शासनास फार आवश्यक ठरते. कारण असे की आपला राज्यकारभार किती आदर्श पद्धतीने चालला आहे याचा कायद्याच्या कसोटीवर खरे उतरणे हा एक मापदंड असू शकतो. न्यायालयीन बारकाई तपासणीतून शासनाची कृती जेव्हा तावून सुलाखून न्यायनिर्णयाद्वारा सुखरूपपणे मान्यता पावते तेव्हा ती कृती त्या मापदंडावर खरी उतरली असे म्हणता येऊ शकेल. ही बाब यासाठी महत्वाची आहे की शासनाच्या कृतीवर न्यायालयाने गंभीर ताशेरे ओढले अशी बरीच उदाहरणे आहेत.

यामुळे न्यायालयात आपली प्रतिमा मलीन होणार नाही याची खबरदारी शासनाने व पर्यायाने सर्व शासनाच्या अधिकाऱ्यांनी घेणे फारच आवश्यक ठरते. कायद्याने वसविलेल्या राज्याने, आपल्या कारभारात नेहमीच आदर्श पद्धतीने वागणे अपेक्षित आहे. मग ती कृती कार्यकारी म्हणून असो कि अर्धन्यायिक संस्था म्हणून असो वा पक्षकार म्हणून असो.

शासन हा फार मोठ्ठा पक्षकार असतो व आहे. न्यायालयात शासनाची अनेक प्रकरणे असतात. नागरिक विरुद्ध शासन, तसेच शासन विरुद्ध नागरिक अशी अनेक प्रकरणे नेहमीच सुरु असतात.

न्यायालयासमोर पक्षकार म्हणून भूमिका पार पाडताना देखील तशाच आदर्श पद्धतीने शासनाने वागणे अपेक्षित आहे. म्हणूनच शासनाला Model Litigant, म्हणजेच “**आदर्श पक्षकार**” म्हणून देखील समजले जाते ही बाब येथे विशेष लक्षात घेण्याजोगी आहे.

(C) Adv. Nahush Khubalkar

एक मॉडेल लिटीगंट, आदर्श पक्षकार म्हणून न्यायालयासमोर शासनाने वागताना तात्त्विक स्तरावर काय करावे, कसे वागावे हा एक स्वतंत्र व मोठा विषय होऊ शकतो. त्याबद्दल थोडक्यात सांगावयाचे झाले तर:

- कोणत्याही प्रकरणात शासनाची भुमीका ही नेहमी न्याय्य असली पाहीजे;

- सर्वसाधारण पक्षकाराप्रमाणे नेहमीच भांडण्याची शासनाची वृत्ती नसावी;

- जर आपल्याच प्रजेच्या समस्यांचे निराकरण करणे आपल्याला शक्य असेल तर तसे करणे अपेक्षित आहे.

हे झाले तात्त्विक स्तरावर. परंतु व्यावहारिक स्तरावर, रोजच्या न्यायालयीन कामकाजामध्ये भाग घेताना, आदर्श पक्षकार या नात्याने भूमिका बजावताना काय अपेक्षित आहे. तर:

- आपल्या कार्यामध्ये अधिकाधिक सुसूत्रता कशी येईल;

- न्यायालयाच्या न्यायदानाचे कामकाज आपल्या शिस्तीमुळे सुलभ होण्यास आपली कशी मदत होईल;

- न्यायप्रक्रीयेमध्ये लागत असलेला विलंब आपल्यामुळे कमीतकमी कसा होऊ शकेल.

या आणि यासारख्याच ईतर महत्वाच्या बाबी देखील

(C) Adv. Nahush Khubalkar

शासनाच्या "आदर्श पक्षकार" या भूमिकेमध्ये समाविष्ट असतात.

परंतु प्रत्यक्षात मात्र तसे होताना फारच कमी दिसते. परिणामी शासनावर बरेचदा न्यायालयीन प्रकरणामध्ये ताशेरे ओढल्या जातात, मोठमोठ्या अधिकाऱ्यांवर नामुश्कीची वेळा येते. दंड लागतो. न्यायालयीन अवमानाची कार्यवाही होते. प्रकरण अंगलट येते व हकनाक त्रास होतो.

हे सगळे टाळता येईल काय ? असल्यास कसे ? त्याकरिता कोणत्या छोट्या छोट्या परंतु महत्वाच्या खबरदाऱ्या घ्याव्यात ? असा प्रश्न बरेचदा पडतो.

या पार्श्वभूमीवर आपल्या उच्च न्यायालयातील व्यवसायाच्या अनुभवाच्या आधारे लेखकाने जेव्हा मनन केले तेव्हा असे आढळले की न्यायालयीन प्रकरणे हाताळताना मुळातच कुठेतरी काहीतरी योग्य होत नाही आहे. अधिक खोलात जाऊन विचार करता असे लक्षात आले की न्यायालयीन प्रकरणे हाताळताना अत्यंत प्राथमिक स्तरावर ज्या काळज्या / खबरदाऱ्या घेण्यास हव्या त्याकडे जरासे दुर्लक्षच होते.

याचे कारण म्हणजे मार्गदर्शनाचा अभाव हे असू शकते. जेव्हा जेव्हा शक्य असेल तेव्हा तेव्हा वैयक्तिक स्तरावर शासकीय अधिकाऱ्यांना लेखक नेहमीच आपल्या परीने मार्गदर्शन करीत असतात. त्याचा थोडाबहुत परिणाम देखील होतो. तरी तो अतिशय कमी प्रमाणात होतो. सर्वच स्तरावर ते मार्गदर्शन पोहचत नाही.

याशिवाय असेही लक्षात आले कि काळानुरूप शासनाविरुद्ध न्यायालयीन प्रकरणांचा पसारा प्रचंड वाढलेला आहे. अशा परिस्थितीत शासकीय अधिकाऱ्यांना याबाबतीत मार्गदर्शनाची प्रचंड गरज आहे. परंतु अशा प्रकारचे कोणतेही मार्गदर्शक पुस्तक उपलब्ध नाही. म्हणूनच ती उणीव भरून काढण्यासाठी ते सर्व मार्गदर्शन एका

(C)Adv. Nandesh Khubalkar

मार्गदर्शिकेच्या स्वरुपात येथे उपलब्ध करून दिल्या जाते आहे.

पुस्तिकेतील मार्गदर्शन हे लेखकाच्या हायकोर्टातील अनेक वर्षांच्या अनुभवावर आधारित आहे. काही भागांतील मार्गदर्शन हे कायद्यावर आधारित आहे. परंतु मार्गदर्शन हे वाचकाला चट्कन कळावे व व्यवहारात उपयोगी पडावे या उद्देशाने कायद्याच्या थेअरी ला बराचसा फाटा दिलेला आहे. अधिक अभ्यासासाठी वाचकांनी त्या त्या कायद्याची पुस्तके वाचावीत असे मी सुचवितो.

या पुस्तिकेतील मजकुराचे स्वरूप जाणीवपूर्वक अतिशय साधे ठेवले आहे. क्लिष्ट व जडबंबाळ भाषा जाणीवपूर्वक टाळली आहे. पुस्तिकेचे साधे स्वरूप हे त्यातील मार्गदर्शनाकडे दुर्लक्ष करण्याचे कारण ठरू नये.

यातील मार्गदर्शनाचा उद्देश आपल्याला घाबरविण्याचा मुळीच नाही. तर आपली जाणीव तीव्र व्हावी व आपल्याकडून नेहमी योग्य अशाच कृती घडाव्या असा आहे.

तसेच येथे एक महत्वाची बाब देखील स्पष्ट करणे उचित ठरेल की शासनाने नेहमीच पडती बाजू घ्यावी असे लेखकास म्हणावयाचे आहे असा गैरसमज कोणीही करून घेऊ नये. शासनास एक्सप्लॉईट करणारी, अधिकाऱ्यांची पिळवणूक करणारी, न्यायप्रक्रियेचा अब्युज करणारी प्रकरणे जरूर जोरदारपणे बचाव करावीत, विरोध करावीत. व अनेकवार लेखकाने स. सरकारी वकील म्हणून कार्य करताना तसे केलेले आहे.

या मार्गदर्शिकेला शासकीय अधिकाऱ्यांनी / लीगल ऑफिसर्स नी न्यायालयीन प्रकरणे हाताळताना नेहमी जवळ बाळगणे व रेफर करीत राहणे अपेक्षित आहे.

❑❑❑❑❑

(C) Adv. Nanush Khubalkar

# 2

# चला चर्च बांधूया !
# - काय आहे आपले व्हिजन-

## तीन कारणे

एक फारच सुंदर गोष्ट आहे. डोळे उघडविणारी.

एका मोठ्या चर्चचे बांधकाम चालू होते. तेथे काही पाथरवट दगड फोडण्याचे काम करीत होते. चर्चचा पाद्री बांधकामाची पाहणी करीत होता.

पाहणी करता करता तो एका पाथरवटाजवळ गेला आणि त्याला विचारले, " तू काय करतो आहेस ?". तो पाथरवट उत्तरला, "दिसत नाही काय ! मी दगड फोडतो आहे."

पाद्री महाशय एका दुसऱ्या पाथरवटाजवळ गेले आणि त्यांनी त्याला तोच प्रश्न केला, " तू काय करतो आहेस ?". तो पाथरवट उत्तरला, "महाशय! मी आपल्या कुटुंबासाठी आपली रोजी रोटी कमावतो आहे."

पाद्री महाशय एका तिसऱ्या पाथरवटाजवळ गेले आणि त्यांनी त्याला तोच प्रश्न केला, " तू काय करतो आहेस ?" तो पाथरवट उत्तरला, "महाशय! मी चर्च बांधतो आहे."

गोष्ट छोटीशीच असली तरी त्यातील संदेश फार फार महत्वाचा आहे. काय समज मिळते बर त्या कहाणीतून. इथे याक्षणी दोन मिनिटे डोळे बंद करून मनन करा.

तिन्ही पाथरवटापैकि आयुष्यात कोण जास्त सुखी, समाधानी

(C) Adv. Nanush Khubalkar

असेल बरं !. कोणाच्या कामात कौशल्य जास्ती असेल. प्रत्यक्षात काम करतेवेळी देखील आनंदी कोण असेल. आणि मुख्य म्हणजे तिघांपैकी कोणत्या पाथरवटाची समज, आंतरिक भाव बरोबर असेल.

तिघांचेही कामाचे बाह्य स्वरूप अगदी सारखे होते: दगड फोडणे. फरक होता तो आंतरिक दृष्टीचा, ॲटीट्युड चा, ॲप्रोच चा.

पहिला हा फक्त समोर आलेले काम करणे एवढीच दृष्टी बाळगून होता.

दुसऱ्याची दृष्टी थोडी मोठी होती. परंतु तरीही स्वत: व कुटुंबापर्यंत मर्यादित.

तिसऱ्याची दृष्टी मात्र विशाल होती. **तिसऱ्या पाथरवटाच्या भावातून तयार होणारे चर्च कितीतरी सुंदर, कौशल्यपूर्ण, आणि शांती प्रदान करणारे असेल हे वेगळे सांगावायालाच नको**.




तर प्रत्येकास प्रश्न असा आहे, की *"माझे काम करताना मी*

(C) A... ish Khubalkar

*मनात कोणता भाव ठेवून रोज वावरतो. काय मी पहिल्या पाथरवटासारखा केवळ समोर आलेले काम कसेतरी निपटवितो ? की दुसऱ्या पाथरवटासारखा मी केवळ माझा व माझ्या कुटुंबापुरताच मर्यादित विचार करतो. की मी काम करताना, प्रत्येक क्षणी, **'मी राष्ट्रबांधणी (nation building), समाजबांधणी चे काम करतो आहे'** असा भाव ठेवतो."*

न्यायालयीन प्रकरणांकडे आपण *"काय आलीय डोकेदुखी!", "काय कटकट आहे !"* अशासारख्या भावांनी बघत असतो काय? याचे उत्तर आपल्या अंतरंगातून काय निघते आहे? पहिल्या प्रथम आपणास आपला **भाव बदलणे फार फार आवश्यक आहे**.

न्यायालयीन प्रकरणांमध्ये शासन म्हणून आपली बाजू मांडण्याचे काम करताना ज्या ज्या काही कृती कराव्या लागतात त्या त्या करताना आपण कोणता भाव मनात बाळगतो आहे, यावर मनन होणे आवश्यक आहे.

न्यायदानासारख्या महत्वाच्या कार्यात न्यायालयाला पूर्ण सहकार्य केल्याने न्यायालयास योग्य असे न्यायदान करण्यास मदत होत असते. असे करून **आपण पर्यायाने राष्ट्रबांधणीचेच काम करीत आहोत,** याची सतत जाणीव बाळगणे आवश्यक आहे.

न्यायालयीन प्रकरणांकडे बघण्याचा आपला दृष्टीकोन बदलण्याचे हे तर झाले **पहिले कारण**.

## दुसरे कारण

न्यायालयीन प्रकरणांकडे बघण्याचा आपला दृष्टीकोन बदलण्याचे दुसरे कारणही फार महत्वाचे आहेत.

**दुसरे कारण** म्हणजे न्यायालयीन प्रकरणांकडे आपण योग्य ते

(C) Adv. Nahush Khubalkar

लक्ष दिले नाही तर **ही बाब कधीही आपल्यावर उलटू शकते**. त्यामुळे आपल्यावर...

- वैयक्तिक ताशेरे ओढले जाणे,
- विभागीय चौकशी होणे,
- न्यायालयाने दंड ठोठावणे,
- वर्तमानपत्रात अपप्रसिद्धी होणे,
- न्यायालयाची अवमान कार्यवाही होणे
- व परिणामी प्रचंड मानसिक त्रास होणे
- वेळेचा, पैशाचा अपव्यय होणे

...असे प्रकार केव्हाही घडू शकतात. कमीतकमी हे सर्व टाळण्यासाठी तरी वेळीच सावध होण्यात शहाणपण नाही काय ?

## तिसरे कारण

**तिसरे कारण** म्हणजे आपल्या विभागाचे न्यायालयीन प्रकरण हा देखील आपल्या **कामाचा अविभाज्य भाग** असतो.

जसे आपले ऑफिसचे प्रशासकीय काम असते, तसेच आपल्या ऑफिस संबंधित न्यायालयीन प्रकरण हे देखील आपल्या कामाचा अविभाज्य भाग असतो. हे येथे समजणे, स्वीकारणे आवश्यक आहे.

❑❑❑❑❑

(C) Adv. Nahush Khubalkar

# 3

# न्यायालयीन प्रकरणे हाताळण्याबाबत मार्गदर्शक सुचना

## <u>मुळापासून सुरवात</u>

न्यायालयीन प्रकरण हाताळण्यामध्ये सर्वात पहिली बाब म्हणजे **मुळातच न्यायालयीन प्रकरण उदभवणारच नाही हे बघा**. शासन ह्या नात्याने आपली प्रत्येक कृती ही कायदेशीर चौकटीच्या आत राहूनच करा. जसे विधिमंडळाने पारित केलेला अधिनियम, शासनाने पारित केलेले नियम, नोटिफिकेशन, शासन निर्णय, सर्क्युलर वगैरे.

*"न्यायालयीन प्रकरणच मुळात उदभवणारच नाही असे वागणे"* म्हणजे नेमके काय या प्रश्नाचे उत्तर खालीलप्रमाणे देता येईल.

- नेहमी आपली ॲक्शन ही अस्तित्वात असलेल्या, प्रकरणाला लागु असलेल्या कायद्यानुसार घेणे. म्हणजेच कायद्यानेच चालणे.

- कायद्याची एखादी बाब लक्षात येत नसेल तर त्याबाबतीत कायदेतज्ज्ञांचा सल्ला घेणे व त्यानुसार वागणे.

- उद्भवलेला प्रश्न वा समस्या, न्यायालयात भांडण्याऐवजी बाहेरच सोडवता येऊ शकते काय या दृष्टीने विचार करणे,

(C) Adv. Nahush Khubalkar

बघणे, व शक्य असेल तर तेथे तसे करणे.

- आपल्या देशात संविधानाचे, कायद्याचे (रुल ऑफ लॉ चे ), राज्य आहे (मनमानीचे म्हणजेच arbitrariness चे नाही) याचे भान ठेवणे.

- **नैसर्गिक न्यायतत्वांचे** म्हणजेच प्रिंसिपल्स ऑफ नॅचरल जस्टिस चे नेहमीच पालन करणे. ही तत्वे कोणती? तर ती खालीलप्रमाणे आहेतः

    - कोणत्याही व्यक्तीविरुद्ध कोणतीहि ॲक्शन, वा ऑर्डर (त्याला त्रास होऊ शकेल असा) पारीत करण्यापूर्वी त्याला शो कॉज नोटीस देऊन आपले म्हणणे मांडण्याची संधी देणे.

    - उत्तर दाखल करण्यासाठी योग्य तेवढा अवधी त्यास देणे.

    - आदेश पारीत करण्यापूर्वी त्याला सुनावणीची संधी (हिअरींग) देणे.

    - आदेशामध्ये **कारणे** नमूद करणे. म्हणजेच **रीझन्ड ऑर्डर** पास करणे.

    - हिअरींग मध्ये मांडलेल्या मुद्द्यांबद्दल विचार करणे, व

(C) Adv. Nanush Khubalkar

असा विचार केल्या गेला आहे ही बाब आदेशामध्ये रिफ्लेक्ट होणे.

- सारासार विचार करून कायद्यानुसारच आदेश करणे. आपली मीमांसा / चिकित्सा ही आदेशामध्ये रिफ्लेक्ट व्हावयास हवी.

- आदेश त्यास कळविणे.

## ईतर महत्वाच्या सूचना

- विभागातील महत्वाचे अधिकाराचे पद स्वीकारल्यावर प्रथम तुमच्या विभागाचे नेमके कोणते अधिकार, जवाबदाऱ्या व कार्ये आहेत याची नीटपणे अचूक माहिती मिळवा. आपल्या पदामुळे मिळणारे अधिकार अधिकारांच्या मर्यादा, कर्तव्ये या बाबींची पूर्ण माहिती करून घ्या.

- आपल्या विभागाला लागू असलेल्या सर्व कायद्यांची माहिती करून घ्या. कायदे जसे विधिमंडळाने पारित केलेला ॲक्ट (अधिनियम), त्या अंतर्गत शासनाने पारित केलेले रुल्स (नियम), शासन निर्णय, नोटीफिकेशन्स, सर्क्युलरस् वैगेरे

- तसेच आपल्या विभागाला लागू असलेल्या, विभागाशी संबंधित असलेल्या सर्व महत्वाच्या, उच्च न्यायालयाच्या तसेच सर्वोच्च न्यायालयाच्या, निवाड्यांची माहिती ठेवा. ते सर्व एका वेगळ्या फाईल मध्ये संकलित करा.

(C) Adv. Nahush Khubalkar

- लॉ अँड ज्युडीशियरी डिपार्टमेंट ने प्रसिद्ध केलेल्या Conduct of Legal Affairs Rules चे वाचन करा.

- आपल्या कडे एखादा अर्ज प्रलंबीत असेल तर तो पेंडिंग ठेवू नका. त्याचा लवकरात लवकर निपटारा करा.

- प्रलंबित अर्ज निकाली काढताना कोणत्या कायद्याच्या कोणत्या तरतुदीन्वये तो निकाली काढतो आहे याची माहिती व भान ठेवूनच त्या कायद्याच्या तरतुदींचे पालन करून तो निकाली काढा. आवश्यक त्या ठिकाणी नैसर्गिक न्याय तत्वाचे पालन जरूर करा.

- प्रत्येक केसमध्ये ***"केस पुढे फार नं भांडता आतासुद्धा आपण त्याच्या तक्रारीचे निवारण करू शकतो काय?",*** या दृष्टीने जरूर विचार / मनन / करा.

- शक्य असल्यास कायद्याच्या व आपल्या अधिकारांच्या मर्यादेत राहून तसे करून न्यायालयीन प्रकरण मिटवून टाका. अशा प्रकारे आपल्या department च्या विकासातील अडसर दूर करण्याच्या कार्यात, परीणामी राष्ट्रबांधणीच्या कार्यात आपण हातभार लावु शकता. **जेथे जेथे हे शक्य आहे तेथे तेथे असे करणे अपेक्षीत आहेच**. व आपल्या वकिलाच्या सल्ल्याने तसे करावे.

(C) Adv. Nahush Khubalkar

- ज्या केसमध्ये आपल्या विभागाची खरेच चूक आहे असे लक्षात आले असेल तेथे **चूक आपल्या स्तरावर पहिल्या प्रथम स्वीकार करा.** चूक असतांनाही चूक मान्य नं करता आत्मप्रौढीने चुकीचे समर्थन करणे, जाणून बुजून न्यायालयात खटला चालविणे, निर्णय घेण्यात व खटल्यावरील खर्चासाठी शासकीय यंत्रणेला बाध्य करणे यामुळे जनतेच्या पैशाचा अपव्यय होतो. याचिकाकर्त्याला कारण नसतांना आर्थिक व मानसिक त्रास होतो. तसेच न्यायालयीन कामकाजात वारंवार उपस्थित राहावे लागल्याने तुमचे प्रशासकीय काम प्रभावित होते व त्यामुळे जनहिताकडे दुर्लक्ष होते हे लक्षात घ्यावे. म्हणूनच शक्यतो ज्या ज्या प्रकरणात शक्य असेल त्या त्या प्रकरणात समजुतीने वागून याचिकाकर्त्याच्या मागण्यांचा सहानुभूतीपूर्वक विचार करून त्वरित निर्णय घेतला पाहिजे.

- यामुळे शासनाविरुद्ध चालणारे अनावश्यक न्यायालयीन खटले टाळता येतील. न्यायालयीन कामकाजात वाया जाणारा अधिकाऱ्यांचा वेळही वाचविता येईल व तो शासकीय कामासाठी आणि जनतेच्या कामासाठी उपयोगात आणता येईल.

- न्यायालयीन प्रकरणास नेहमीच **महत्व, प्राथम्य, priority** जरूर द्या. खासकरून हायकोर्टातील केसबाबत तर हे पाळाच.

- सरकारी वकिलाच्या (वा आपल्या वकिलाच्या) कार्यालयातून मिळालेल्या पत्राला , फोनला, प्रत्येक संदेशाकडे दुर्लक्ष करू

(C) Adv. Nahush Khubalkar

नका. **<u>जरूर व लवकर प्रतिसाद द्याच</u>**.

➥ बरेचदा चालू असलेल्या प्रकरणामध्ये न्यायालयास एखाद्या छोटाश्या मुद्द्यावर माहिती हवी असते. त्यावेळी त्या मुद्द्यावर वकिलाने केलेले स्टेटमेंट देखील चालणार असते. त्या स्टेटमेंटच्या आधारावर प्रकरण लवकर संपविणे असा न्यायालयाचा उद्देश असतो. अशा प्रसंगी त्या मुद्द्यांवर वकिलाकडून आपणास फोनवरच विचारणा होत असते. तर अशा प्रसंगी त्यास लवकरात लवकर प्रतिसाद द्या. असे करून आपण पर्यायाने स्पीडी डीसपोझल च्या महत्वाच्या कार्यास हातभार लावत असतो.

➥ **<u>सुरवातीला मिळालेल्या वेळेतच आपले उत्तर / ॲफिडेव्हीट दाखल करण्याची दक्षता घ्या</u>**. लक्षात असु द्या की आपणास अनेकदा वेळ देणे अथवा नं देणे हे केवळ मा. **न्यायालयाच्या मर्जीवर असते**. वेळेकरीता केवळ विनंती करणे आपल्या हातात असते. प्रसंगी न्यायालय आपली जास्त वेळेची विनंती फेटाळून लावू शकते, अथवा costs वगैरे लावून मान्य करू शकते. उत्तर दाखल न करता केसमध्ये अनेकदा वेळ मिळणे अथवा तारीख मिळणे हा काही आपला अधिकार नसतो. म्हणून पूर्वी मिळालेल्या वेळेतच आपले उत्तर / ॲफिडेव्हीट दाखल करण्याची दक्षता घ्या.

➥ वकिलांस, एखादा मुद्दा अथवा एखादी बाब स्पष्ट वाटत नसल्यास व आवश्यकता भासल्यास ते आपल्यास

(C) Adv. Nanush Khubalkar

**चर्चेकरीता बोलावू** शकतात. चर्चेस जाताना, **<u>प्रकरणाचा अभ्यास</u>** <u>करून जाणे</u> अपेक्षित आहे. जेणेकरून चर्चा अर्थपूर्ण होईल. *'मी तर आताच बदलून आलो; आताच जॉईन झालो; आताच चार्ज घेतला; मी वाचलेच नाही'* अशा सबबी सांगणे टाळा.

- सरकारी वकील / आपले विभागाचे वकील आपल्याला प्रकरणाशी संबंधित (परंतु कदाचित आपणास असंबद्ध वाटू शकणारे) अनेक प्रश्न विचारू शकतात. असे प्रश्न त्यांच्या न्यायालयातील अनुभवाच्या आधारे, न्यायालय कोणते प्रश्न विचारू शकेल या शक्यतेच्या आधारावर असतात. कधी कधी आपल्याला ते प्रश्न विरोधी देखील भासू शकतात. सर्व बाजूंनी प्रकरणाचा अभ्यास करताना हे आवश्यक असते. तेव्हा हे समजून घ्या. तेव्हा अशावेळी कोणताही गैरसमज टाळणे महत्वाचे असते. उलट येथे खुल्या विचारांची आवश्यकता आहे.

- चर्चेदरम्यान बरेचदा वकिलास मूळ कागद / रेकॉर्ड तपासण्याची आवश्यकता भासते. तेव्हा चर्चेस जाताना, अभ्यासाव्यतिरिक्त, **<u>प्रकरणाचा मूळ record</u>** सोबत नेण्याने चर्चा अर्थपूर्ण होईल. वेळदेखील वाचेल.

## <u>शासन जेव्हा वादी असतं तेव्हा....</u>

बऱ्याचदा शासनास वादी / पिटीशनर व्हावे लागते. अशा वेळी केस दाखल करण्यापूर्वी 'मॉडेल लिटीगंट' म्हणून शासनाची काही

(C) Adv. Nahush Khubalkar

जवाबदारी असते. केवळ वरच्या न्यायालयात जाण्याची तरतूद कायद्यामध्ये आहे म्हणून केस फाईल केलीच पाहिजे असे नाही.

वरच्या न्यायालयात केस फाईल करण्याकरीता आपल्याजवळ अर्थपूर्ण व कायदेशीर ग्राउंडस आहेत काय ते तपासणे आवश्यक असते. व हे कार्य देखील अत्यंत बारकाईने करणे आवश्यक आहे. बरेचदा रिट याचिका अथवा अपिले दाखल करताना तसे होणे राहून जाते.

मा. मुंबई उच्च न्यायालयाने *महा. शासन वि. देविदास निवृत्ती गवळी व ईतर* या क्रिमिनल अप्लिकेशन क्र. 508 / 2012 मध्ये दि. 26-4-2012 या तारखेला खालीलप्रमाणे ऑब्झर्व केले व मार्गदर्शक तत्वे घालून दिलीत.

> *"9. However, since 9 th April, 2012 i.e. the date from which this Bench is taking up the present assignment, we have come across very disturbing factor, that even in cases where there is no scope for interference at all, the applications for seeking leave to appeal against acquittal are being filed by the State as a matter of routine.*
>
> *10. By now it is is a settled principle of law that the interference in an appeal against acquittal is warranted only when Court comes to a finding that the view taken by learned trial Court is either perverse or impossible.*
>
> *11. We can understand the State is filing the applications for seeking leave to appeal when cases are **border line***

(C) Adv. Nahush Khubalkar

***cases*** *and there is some scope for interference for this Court.* ***However, like in the present case when there is no material at all, still the application is preferred by the State for seeking leave to appeal. Apart from the fact that State is expected to be a model litigant, the expenses of filing such proceedings are borne from the public funds which is a tax payers' money. Merely because the money spent on such a litigation is from the public funds, cannot be a ground for filing the applications for seeking leave to appeal as a matter of routine. Not only that but the valuable time of the Court as well as the Public Prosecutors is wasted in such unnecessary exercise. As it is, the Courts are burdened with heavy pendency of matters. Such unwarranted challenges to findings of acquittal, unnecessarily adds to the already heavily burdened Courts.*** *In that view of the matter, we are inclined to issue following directions to the State Government:*

> *(i) After the Judgment and orders are delivered by the learned trial Judges, the concerned APPS appearing in the trial Court shall personally go through the evidence and the judgment and after scrutiny thereof, if satisfied, that the view taken by the learned trial Court is either perverse or impossible, shall recommend filing of an application for leave to appeal.*

(C) Adv. Nahush Khubalkar

*(ii) On receipt of such proposals, the Secretary or the concerned Joint Secretary shall again verify the proposal and if it is found that the view taken by the trial Court is neither perverse nor impossible, shall decide not to challenge findings of acquittal.*

*(iii) If the proposal is received by the office of the Public Prosecutor in the High Court, the concerned Public Prosecutor to whom the files are assigned, shall again go through the evidence on record and the judgment to find out as to whether the view taken by the trial Court is perverse or impossible. If the learned APP is of the view that the view taken by the learned trial Court is a possible view and it is neither impossible nor perverse view, it shall give its opinion in writing to the Secretary or concerned Joint Secretary of law and Judiciary Department.*

*(iv) After the receipt of the opinion of the learned APP that the case of acquittal is not a fit case to challenge, the Secretary or the concerned Joint Secretary shall re-examine the matter and decide as to whether the application for leave to appeal should be filed or not. However, if the officer disagrees with the opinion of the APP and decides to grant sanction to file an application for leave to*

(C) Adv. Nahush Khubalkar

*appeal, it shall record reasons as to why it disagrees with the opinion of the learned APP.*

*12. In the applications for leave to appeal filed hereinafter, if we come across that the same are filed by the State challenging the findings of acquittal which cannot be said to be perverse or impossible, we will be constrained to take serious view of the matter. We clarify that in case the learned APPs give their opinion in a casual manner without applying their mind, we will hold such APPs responsible for proposing such unwarranted applications. We further clarify that if, even after the opinion of learned APP that the finding of acquittal is not perverse or impossible, still the appeal is filed at the instance of concerned Secretary or Joint Secretary and if we ultimately find that finding is neither perverse or impossible, we will be constrained to hold such a Secretary or a Joint Secretary responsible for filing the unwarranted application seeking leave to appeal.*

*13. An authenticated copy of this order be supplied to the learned PP who shall in turn forward this copy to the learned Principal Secretary, Law and Judiciary Department who shall circulate the same amongst all the Joint Secretaries and the Public Prosecutors."*

(C) Adv. Nahush Khubalkar

वरील उद्धृत आदेशातील भागावरून शासन म्हणून न्यायालयीन प्रकरण सुरु करताना काय करणे अपेक्षित आहे याची बऱ्यापैकी कल्पना येते.

यासारखीच तत्वे **दिवाणी प्रकरणांमध्ये** देखील पाळणे आवश्यक आहे.

❑❑❑❑❑

(C) Adv. Nahush Khubalkar

# 4

# परिच्छेदनिहाय उत्तरे, म्हणजेच पॅरावाईज कॉमेंटस कसे तयार कराल

## पॅरावाईज कॉमेंटस चे महत्व

दिवाणी केसेस मध्ये प्लीडींगचे – जसे प्लेंट, पिटीशन, रिटन स्टेटमेंट, वगैरे चे फार महत्व आहे. दिवाणी प्रक्रिया कायद्यानुसार, वादीला वा कोणत्याही पक्षकाराला लेखी स्वरूपात, नेमकेपणाने, आपली केस न्यायालयासमोर मांडावी लागते. अश्या लेखी स्वरुपात न्यायालयासमोर मांडलेल्या केसचा मसुदा, हाच वादीच्या केसचा पाया बनतो. वादीला अशी लेखी स्वरुपात केस अतिशय काळजीपूर्वक मांडावी लागते. हे काम एक्स्पर्ट वकिलांकडून केल्या जाते. एकदा असा लेखी स्वरुपात पाया मांडला की मग त्याबाहेर वादी जाउच शकत नाही. त्या लेखी स्वरूपाच्या मर्यादेतच त्यास आपली केस सिद्ध करावी लागते.

प्रतिवादीला, वादीच्या केसमध्ये न्यायालयाने काढलेल्या नोटीसीला, लेखी स्वरूपातच व नेमकेपणाने उत्तर दाखल करावयाचे असते. जशी वादीने लेखी स्वरुपात मांडलेली केस हाच वादीच्या केसचा पाया बनतो, तसेच प्रतिवादीने लेखी स्वरूपात दिलेले उत्तर हे प्रतिवादीच्या केसचा पाया बनते. प्रतिवादीच्या उत्तरामध्ये, वादीने लिहिलेल्या प्रत्येक ओळीचा / परिच्छेदाचा / मुद्द्याचा समाचार घेणे आवश्यक असते. येथे हे समजून घ्या की प्रतिवादीच्या उत्तरामध्ये वादीने लिहिलेल्या एखाद्या महत्वाच्या ओळीचा / परिच्छेदाचा /



(C) Adv. Nahush Khubalkar

मुद्द्याचा **समाचार घेतलेला नसेल** तर असा मुद्दा, अशी बाब ही **प्रतिवादीला मान्य आहे असे न्यायालय समजू शकते (प्रिझ्युम करू शकते)**, व अशी मान्य समजली गेलेली बाब, न्यायनिवाडा प्रतिवादीच्या विरुद्ध जाण्यास कारणीभूत ठरू शकते. त्यामुळे उत्तराचा मसुदा बनविताना देखील अतिशय कौशल्यपुर्वक लिहावा लागतो, ड्राफ्ट करावा लागतो.

असा उत्तराचा मसुदा तयार करण्यापूर्वी सरकारी वकील लेखी स्वरूपात विभागाचे पॅरावाईज कॉमेंटस मागवितात. त्यामागचा उद्देश असा असतो की प्रतिवादीचे / विभागाचे / अधिकाऱ्याचे उत्तराचा अंतिम मसुदा तयार करण्याच्या प्रक्रियेमध्ये सुलभता, सुसूत्रता यावी; उत्तराचा फायनल मसुदा तयार होण्यापूर्वी सर्व महत्वाच्या बाबी तपासून घेता याव्या. जसे : विभागाचा नेमका स्टँड / भूमिका काय आहे ते कळावे; पिटीशन च्या प्रत्येक मुद्द्याचा समाचार घेतला आहे काय, एखादी महत्वाची बाब सुटली तर नाही ना ते बघणे; एखादी बाब अस्पष्ट तर नाही ना ते बघणे; असल्यास विभागाच्या अधिकाऱ्यास बोलावून चर्चेद्वारा त्यात स्पष्टता आणणे.

अशा प्रकारे आपण दिलेले पॅरावाईज कॉमेंटस हे ॲफिडेव्हीट नव्हे. तर ते आपल्या व आपल्या वकिलाच्या मधले कम्युनिकेशन असते. आपल्या, वकील तयार करणार असणाऱ्या, अंतिम उत्तराचे / ॲफिडेव्हीट चे ते फाउंडेशन असते. ते फार महत्वाचा रोल बजावते. अंतिमरीत्या तयार होणाऱ्या ॲफिडेव्हीट मध्ये पॅरावाईज कॉमेंटस मध्ये आपण दिलेल्या माहितीचा समावेश असतो. त्यामुळे त्याच्या खरेपणा अथवा खोटेपणाला आपण जवाबदार ठरू शकता. त्यामुळे ते तयार करताना मुळातच काळजीपूर्वक तयार करणे आवश्यक आहे.

(C) Adv. Nanush Khubalkar

ते कसे तयार करावे ते आता आपण समजून घेणार आहोत.

## पॅरावाईज कॉमेंटस कसे तयार कराल

खाली पॅरावाईज कॉमेंटस कसे तयार कराल याच्या नेमक्या सूचना दिलेल्या आहेत. असे आढळेल की काही सूचना ह्या एकाच ओळीच्या आहेत. एका सूचनेस केवळ एकच ओळ वाहिलेली आहे यावरूनच त्या सूचनेचे महत्व समजावे. प्रत्येक साधी वाटणारी सूचना तितकीच महत्वाची आहे.

- पॅरावाईज कॉमेंटस तयार करण्यास बसण्यापूर्वी पहिल्या प्रथम याचिकेचे अवलोकन (प्री रीडिंग) करा. काही प्रिलिमिनरी बाबी समजून घ्या. याचिकाकर्ता कोण आहे. कुठला राहणारा आहे. कोणत्या पदावर आहे. तसेच प्रतिवादी कोण आहे. एकूण प्रतिवादी किती आहेत. याचिकेमध्ये आपला विभाग / अधिकारी किती क्रमांकाचा प्रतिवादी आहे. याचिकाकर्त्याने कोणत्या प्रतिवादीविरुद्ध नेमकी कोणती विनंती / प्रेयर केलेली आहे. असे अवलोकन हे पॅरावाईज कॉमेंटस तयार करताना नक्कीच मदतपूर्ण ठरेल.

- रिट याचिका **<u>पूर्णपणे वाचा</u>**. अगदी लाईन टू लाईन वर्ड टू वर्ड वाचा.

- व व्यवस्थितपणे **<u>समजून घ्या</u>**. (वाचून समजा व समजून वाचा.)

  [येथे आपण आपल्या विभागातील विधी

(C) Adv Nahush Khubalkar

अधिकाऱ्यांची मदत घेऊ शकता. आपल्या विभागात विधी अधिकारी नसेल तर त्याची जरूर व्यवस्था करा. तसे पद मंजूर करून घ्या. ते एका काँपीटंट विधी पारंगत व्यक्तीच्या नियुक्तीने भरा. अन्यथा ते कार्य आपल्यालाच करावे लागेल. तेव्हा तशी तयारी ठेवा]

- त्याच्या **तक्रारीचा गाभा** काय आहे ते समजून घ्या. ते गाभेदार मुद्दे नोंद करा.

- याचिकेच्या <u>प्रत्येक पॅराग्राफ मध्ये, याचिकाकर्त्यांनी</u> आपल्या (म्हणजेच आपल्या विभागाच्या अथवा अधिकाऱ्याच्या) विरुद्ध, <u>**नेमकी** काय तक्रार न्यायालयासमोर मांडली आहे, ती **नेमकेपणाने शोधा, लाल पेनने मार्क करा, आयडेंटीफाय** करा.</u>

- अशा प्रकारे आपल्या विभागाविरुद्ध असलेली / असलेल्या नेमक्या तक्रारी (प्लीडींगस) आपल्या लक्षात येतील.

हे केल्याने पुढील फायदे होतातः

- विरुद्धार्थीची केस **नेमकेपणाने** आपल्यास स्पष्ट होते, कळते.

(C) Adv. Nahush Khubalkar

- त्याने न्यायालयात धाव घेण्यास आपली नेमकी कोणती कृती वा अकृती म्हणजेच इनॅक्शन **कारणीभूत ठरली** याची आपणास **जाणीव** होते.

- त्याचवेळी ***"केस पुढे नं भांडता आतासुद्धा आपण त्याच्या तक्रारीचे निवारण करू शकतो काय?",*** यावर आपण मनन / विचार करू शकतो, व तसे करणे अपेक्षित आहे.

- व शक्य असल्यास तसे करून न्यायालयीन प्रकरण मिटवून टाकण्याच्या कार्यात, तसेच आपल्या department च्या विकासातील अडसर दूर करण्याच्या कार्यात, परीणामी राष्ट्र्बांधणीच्या कार्यात आपण हातभार लावु शकता. **जेथे जेथे हे शक्य आहे तेथे तेथे असे करणे अपेक्षीत आहेच**.

- त्याचवेळी त्याने मांडलेल्या प्रत्येक मुद्द्याचे **आपले उत्तर काय असु शकेल** याची आपल्याला कल्पना येते. व विचारांमध्ये स्पष्टता येते.

- त्याची केस कुठे स्ट्रॉंग आहे व त्याच्या केसमध्ये कुठे **फोलपणा** आहे ह्याची बऱ्यापैकी आपल्याला कल्पना येते.

(C) Adv. Nahush Khubalkar

- कोणते मुद्दे हे वस्तुस्थितीशी निगडीत (factual) आहेत व कोणते मुद्दे हे शुद्ध कायद्याशी (purely legal) निगडीत आहेत याची स्पष्ट कल्पना येते.

- आता, एका वेगळ्या कागदावर याचिकाकर्त्याने याचिकेच्या **प्रत्येक** पॅराग्राफ मध्ये प्रत्येक ओळीमध्ये जे काही लिहिले असेल, **त्याप्रत्येक ओळीवर आपले काय म्हणणे आहे**, ते याचिकेमध्ये असलेल्या पॅराग्राफनुसार (म्हणजेच **परिच्छेदनिहाय )** त्या वेगळ्या कागदावर **लिहून काढा / टाईप करा**.

- पॅराग्राफमधील प्रत्येक ओळीवर कॉमेंटस असणे अपेक्षित आहे.

- आपल्याकडून येणारे कॉमेंटस हे **परिच्छेदनिहाय** मागण्याचा उद्देश हा कि आपल्याकडून याचिकेतील प्रत्येक मुद्दान मुद्दा, ओळन ओळ डील केल्या गेली पाहिजे. कोणताच मुद्दा सुटू नये.

- असे सर्व मुद्दे जे factual आहेत, म्हणजेच वस्तुस्थितीशी निगडीत आहे त्यांची माहिती आपणासच द्यावयाची असते. ती रेकॉर्ड च्या आधारेच द्यावयाची असते. रेकॉर्डच्या विसंगत नको.

(C) Adv. Nahush Khubalkar

- असे मुद्दे जे कायद्याशी निगडीत आहेत त्यांची उत्तरे आपणास माहिती असेल तर फारच उत्तम. त्या ठिकाणी केस लॉ चा व ईतर तरतुदींचा जरूर उल्लेख करा.

- कधीही वस्तुस्थितीशी निगडीत कुठलीही चुकीची, दिशाभूल करणारी माहिती देऊ नका.

- तसेच आपल्या रेकॉर्ड शी विसंगत माहिती देऊ नका. हे फार फार महत्वाचे आहे असे समजा.

- पिटीशनरने लिहिलेली बाब जर खरी असेल तर तीचे खरेपण कबूल करण्यास संकोचू नका. [हा! ती बाब खरी असूनदेखील पिटीशनरला मदत करू शकत नाही हे आपणास म्हणावयाचे असेल तर तसे आपण योग्य त्या विश्लेषणासह म्हणू शकता.] लक्षात ठेवा "**सत्यमेव जयते**" हे आमचे ब्रीदवाक्य आहे.

- पॅरावाईज कॉमेंटस तयार करताना **भाषा अतिशय नम्र** असावी, **साधी भाषा** वापरली तरी चालेल. आपले म्हणणे, आपला stand आपल्या वकिलास कळावे, एवढाच उद्देश आहे. त्यास वकील कायदेशीर भाषेत Affidavit / Reply करतेवेळी बसवतील. ते वकिलावर सोपवावे.

- भाषा साधी वापरण्याची मुभा असली तरी त्यात **अतिशय**

(C) Adv. Nanush Khubalkar

**स्पष्टता** असावी. मोघमपणा अथवा संदिग्धता नको. अन्यथा वकिलांकडून आपणास चर्चेस बोलविण्याची पूर्ण शक्यता असते.

- महत्वाच्या परिच्छेदांवर comments तयार करताना, केवळ "denied", "no comments" असे तुटकपणे लिहून सोडून देऊ नये. योग्य त्या ठिकाणी <u>proper explanation, योग्य elaboration जरूर लिहा</u>.

- आपल्या म्हणण्यास, उत्तरास जर कायद्याचा आधार असेल, जसे Act, Statute, Ordinance, G. R., Notification वगैरे, तर त्या **<u>तरतुदींचा जरूर उल्लेख करा.</u>**

- **<u>सर्वच महत्त्वाच्या मुद्द्यांचा</u>** समाचार घ्या. कोणताही महत्वाचा मुद्दा अनुत्तरीत सोडु नका.

- **प्रकरणाला लागू असलेल्या सर्व कायद्यांची माहिती करून घ्या**. कायदे जसे विधिमंडळाने पारित केलेला ॲक्ट (अधिनियम), त्या अंतर्गत शासनाने पारित केलेले रुल्स (नियम), शासन निर्णय, नोटीफिकेशन्स, सर्क्युलरस् वैगेरे. योग्य त्या ठिकाणी त्यांचा जरूर उल्लेख करा.

- तसेच प्रकरणाला लागू असलेल्या, व संबंधित असलेल्या उच्च न्यायालयाच्या तसेच सर्वोच्च न्यायालयाच्या,

(C) Adv. Nahush Khubalkar

**निवाड्यांचा जरूर उल्लेख करा.** (परंतु कोणते रुलिंग केसला लागू आहे व कोणते नाही याबद्दल वकीलसाहेबास ठरवू द्या).

➥ याचिकेच्या शेवटी विनंती परिच्छेद म्हणजेच "**प्रेयर क्लॉजेस**" असतात. ते वाचुन समजुन घ्या. त्यावर आपले काय म्हणणे आहे ते जरूर नोंदवा.

➥ याचीकेबाहेरची परंतु प्रकरणाशी संबंधित असलेली महत्वाची माहीती जरूर 'ॲडीशनल सबमिशन' च्या रुपात नोंदवा.

➥ उत्तरामध्ये **जास्तीत जास्त स्पष्टता** ठेवा. ते व्यवस्थीतपणे टाईप करून **जवाबदार अधिकाऱ्याच्या सहीने** वकीलांकडे पाठवावेत. असे लिखीत स्वरूपात व सहीचे आपले communication आपल्या वकीलांस affidavit चा मसूदा तयार करण्यास मदतीचे ठरते.

## <u>विभागातील / ऑफिसातील विधी अधिकाऱ्याचे, लॉ ऑफिसर असण्याचे महत्व</u>

आपल्या विभागात लॉ ऑफिसर असणे फार गरजेचे आहे. बऱ्याच विभागांमध्ये तसे दिसून येत नाही. परिणामी मुळातच योग्य प्रकारे न्यायालयीन प्रकरणे हाताळल्या जात नाहीत.

(C) Adv. Nahush Khubalkar

लॉ ऑफिसर हा आपण व आपले वकील यामधील महत्वाचा दुवा असतो.

***आपण ⇨ लॉ ऑफिसर ⇨ आपले वकील ⇨ न्यायालय***

आपल्या विभागात / ऑफिसात लॉ ऑफिसर च्या असण्याने खालील फायदे होतात.

- त्याला कायद्याचे व न्यायालयीन प्रक्रियेचे ज्ञान असते.
- केसमधील कायदेशीर भाषेतील (लीगल लँग्वेज मधील व खासकरून इंग्रजीतील) प्लीडींगज् आपल्यापेक्षा त्याला जास्त चांगल्या प्रकारे कळतात.
- केसमधील ईश्श्युज तो जास्त चांगल्याप्रकारे समजू शकतो.
- पॅरावाईज कॉमेंटस तो जास्त व्यवस्थितपणे तयार करू शकतो.
- वकिलाशी / सरकारी वकिलाशी तो जास्त चांगल्याप्रकारे कम्युनिकेट करू शकतो.
- आपल्या कोर्टातील चकरा कमी होतात.
- आपला वेळ आपण आपल्या मुख्य प्रशासकीय कामासाठी देऊ शकता.

तेव्हा आपल्या विभागात / ऑफिसात लॉ ऑफिसर चे पद निर्माण करण्यासाठी व ते भरण्यासाठी जरूर पाठपुरावा करा.

❑❑❑❑❑

(C) Adv. Nahush Khubalkar

# 5

# न्यायालयात शपथपत्र AFFIDAVIT करण्यापूर्वी

- बरेचदा उच्चाधिकारी हे स्वत: शपथपत्र नं करता, खालील ऑफिस मधील अधिकाऱ्याला शपथपत्र करण्याची जवाबदारी सोपवितात. ते योग्य नव्हे. अशा प्रकारांवर न्यायालयाने तीव्र नाराजी व्यक्त केलेली आहे. शपथपत्र करण्याचे कार्य ईतर अधिकाऱ्यांना, विशेषकरून हाताखालच्या अधिकाऱ्यावर / कर्मचाऱ्यांवर सोपवु नका. त्यामुळे शपथपत्राच्या गुणवत्तेवर, विश्वासार्हतेवर प्रश्नार्थक चिन्ह लागते.

- जर अपरिहार्य कारणाने शपथपत्र करण्याचे कार्य इतरांवर सोपवावेच लागले तर, ती व्यक्ती जवाबदार अधिकारीपदावर असावी. त्या व्यक्तिने केसबद्द्लचा संपूर्ण अभ्यास केलेला आहे व ती व्यक्ती / अधिकारी जवाबदारपणे शपथपत्र करण्याचे कार्य करू शकेल याची खातरजमा करून घ्या. मात्र हे अगदी अपरिहार्य कारणाकरिता, नं टाळता येण्याजोग्या परिस्थितीतच करा.

- अशा अपरिहार्य कारणाकरिता, नं टाळता येण्याजोग्या

(C) Adv. Nahush Khubalkar

परिस्थितीत जर आपल्याला आपल्या वरच्या अधिकाऱ्याने शपथपत्र करण्याचे कार्य सोपविले आहे असा अधिकारी आपण असाल तर आपण केसबद्दलचा संपूर्ण अभ्यास करा. तसेच वरच्या अधिकाऱ्याकडून लिखीत स्वरूपात ऑथॉरीटी प्राप्त करून घ्या.

- वकिलांनी तयार केलेले शपथपत्र मसुदा पूर्णपणे वाचून समजून घ्या. ओळन ओळ वाचा. समजून घ्या.

- ॲफिडेव्हीट मध्ये केलेली विधाने ही आपल्या कडील ऑफिस रेकॉर्ड च्या आधारे असावयास हवीत. ऑफिस रेकॉर्ड शी सुसंगत अशीच विधाने ॲफिडेव्हीट मध्ये करा. लक्षात ठेवा की शपथकर्ता या नात्याने ॲफिडेव्हीट मध्ये केलेल्या विधानांबद्दल आपण व्यक्तिश: मुख्यत्वे जवाबदार असता. चुकीच्या विधानांचे गंभीर कायदेशीर परिणाम आपल्याविरुद्ध होऊ शकतात.

- जर वकिलांनी तयार केलेल्या ड्राफ्ट ॲफिडेव्हीट मध्ये लिहिलेल्या विधानांबद्दल आपणास काही दुरुस्त्या सुचवाव्या असे वाटत असेल तर तसे मोकळेपणे आपल्या वकीलसाहेबाशी बोला. व त्यांच्या मदतीने व सल्ल्याने तशी दुरुस्ती करून घ्या.

- याचिकेत तुमच्या विरुद्ध केलेल्या प्रत्येक allegation / argument / मुद्द्या चे समाधानकारक उत्तर तुमच्या

(C) Adv. Nahush Khubalkar

ॲफिडेव्हीट / उत्तरात असणे अपेक्षित आहे.

- ॲफिडेव्हीट मधील भाषा नम्र व साधी असावी. भाषेच्या साधेपणाने आपल्याला करावयाचा असलेला विरोध दुबळा ठरत नसतो.

- ॲफिडेव्हीट चा मसुदा finalize करण्यापूर्वी त्याचे proofreading करा. व्याकरणात्मक व टायपिंगच्या चुका नाहित ना याची खात्री करून घ्या.

- हायकोर्टात येताना आपले ओळखपत्र नेहमी जवळ बाळगा. ते ॲफिडेव्हीट करतेवेळी हायकोर्टातील Oath Administering Officer ला आपली identity पटविण्यास उपयोगी ठरेल.

- ॲफिडेव्हीट हे **notarize** असले तरी चालते.

❒❒❒❒❒

(C) Adv. Nahush Khubalkar

# 6

# अर्धन्यायीक, म्हणजेच क्वासी-ज्युडीशीयल अधिकार वापरताना......

कायद्यान्वये मोठ्या पदांवरच्या अधिकाऱ्यांना, जसे कमिशनर / कलेक्टर वगैरे, अर्धन्यायीक अधिकार प्रदान करण्यात आलेले असतात. अर्धन्यायीक अधिकार ज्याला ईग्रजीमध्ये आपण quasi-judicial powers म्हणतो असे असतात.

अर्धन्यायिक अधिकार हा एक मोठा व स्वतंत्र अभ्यासण्याजोगा विषय आहे. तो विस्तृतपणे तपासणे व त्याचा उहापोह करणे हे या पुस्तिकेच्या आवाक्याबाहेरचे आहे. येथे केवळ बेसिक बाबी आपण बघणार आहोत. अशा बाबी ज्या असे अधिकार वापरताना मार्गदर्शक ठरतील.

असे अधिकार वापरताना अधिकाऱ्याला **न्यायाधीशसदृश** वागणे व संपूर्ण प्रक्रिया **न्यायालयीन प्रक्रियेसदृश** पार पाडणे अपेक्षित असते. सरतेशेवटी निर्णय देऊन दोन पक्षांमधला वाद निकाली काढावयाचा असतो.

कायद्यामधे अशा निकालाविरुद्ध बरेचदा अपील वा रिव्हीजन ची तरतूद असते.

अशी तरतूद नसली तरी भारतीय संविधानातील आर्टीकल 226 / 227 नुसार उच्च न्यायालयामध्ये रिट याचीका तर दाखल करता येतेच.

सांगण्याचा मुद्दा असा की आपण जर असा अर्धन्यायीक अधिकार

(C) Adv. Nahush Khubalkar

प्रदान केलेला ऑफिसर असाल, तर हे नेहमी लक्षात असू द्या की व्यथीत पक्षकार हा आपल्या निर्णयाला, उच्च न्यायालयात रिट याचीकेमध्ये - व त्यानंतर सर्वोच्च न्यायालयातदेखील - चॅलेंज करू शकतो. याचे सतत भान असू द्या.

मा. उच्च न्यायालय आपल्या आदेशाचे (डिसीजन), तसेच आदेश पारीत करताना **आपण पालन केलेल्या प्रक्रियेचे (डीसीजन मेकींग प्रोसेस** चे), बारकाईने तपासणी करते. त्यामुळे केवळ आपले डिसीजन बरोबर असून चालत नाही तर **डीसीजन मेकींग प्रोसेस** सुद्धा योग्य व कायदेशीर असावे लागते.

तर आपले **डीसीजन मेकींग प्रोसेस** सुद्धा योग्य व कायदेशीर असावे याची नेहमी जाणीव ठेवून असणे व त्यानुसार वागणे अपेक्षीत आहे.

त्याकरीता खालील गोष्टी पाळाः

- ज्या तरतुदीने आपल्याला अर्ध न्यायिक अधिकार मिळाले आहेत त्या तरतुदींचा अभ्यास करा. त्या समजून घ्या. त्या तरतुदींशी निगडीत असलेल्या नियमांमध्ये दिलेल्या प्रोसिजरचा सुद्धा अभ्यास करून त्या समजून घ्या.

- नैसर्गिक न्यायतत्वाचे जरूर पालन करा. सुनावणीची संधी हा नैसर्गिक न्यायतत्वाचा अविभाज्य भाग आहे . त्याचे पालन होणे आवश्यक आहे. कायदा म्हणतो A person cannot be condemned unheard.

(C) Adv. Nahush Khubalkar

➥ दोन्ही पक्षकारांना हिअरिंग तारखेची माहिती आहे याची खात्री करा. तसा पुरावा रेकॉर्डवर ठेवा. नसेल तर नोटीस काढा.

➥ केसचे रोजनामे व्यवस्थित लिहा.

➥ त्यांवर उपस्थित पक्षकाराच्या सह्या घ्या.

➥ युक्तिवादाचे मुद्दे व्यवस्थित समजून घ्या. युक्तिवादाच्या शक्यतोवर नोट्स काढा.

➥ **<u>प्रत्यक्ष ज्या अधिकाऱ्याला</u>** कायद्याच्या तरतुदीनुसार हिअरिंग चा अधिकार दिला आहे त्याच अधिकाऱ्याने [अथवा (कायद्यामध्ये डेलिगेशनची तरतूद असेल तरच) असा <u>ईतर</u> अधिकारी ज्यास वरच्या अधिकाऱ्याने त्या कायद्यानुसार हिअरिंग चा  अधिकार अधिकार प्रदान केलेला (delegate केलेला) आहे] हिअरिंग घेतले पाहिजे.

➥ हिअरिंग एका अधिकाऱ्याने घेणे व आदेश दुसऱ्या अधिकाऱ्याने पारित करणे असे करू नका.

➥ जर प्रकरणामध्ये **कोणत्याही प्रकारे आपला हितसंबंध गुंतला असेल** तर प्रकरण स्वत: चालवू नका. कायदा म्हणतो "No person shall be a judge in his own

(C) Adv. Nanush Khubalkar

cause."

- आदेश पारित करताना योग्य ती कारणमीमांसा करा. म्हणजेच **रीझंड ऑर्डर** पास करा.

- आदेशात दोन्ही पक्षाच्या युक्तिवादाचे **सर्वच मुद्द्यांचा समाचार घ्या**. कोणताही मुद्दा सोडू नका.

- आदेश पक्षकारांना **कळवा.** व त्याचा पुरावा रेकॉर्डवर असू द्या.

❑❑❑❑❑

(C) Adv. Nahush Khubalkar

# 7

# बेल मॅटर मधे उत्तर तयार करताना

बेल प्रकरणामध्ये बरेचदा असा अनुभव असतो की येणारा पोलीस अधिकारी हा प्रकरणाचा अभ्यास करून आलेला नसतो.

असेही पाहण्यात आले आहे की झालेल्या पोलीस तपासाबाबत पब्लिक प्रॉसिक्युटर साहेबांनी प्रश्न विचारला की तपासी अधिकारी उत्तर न देता रायटर कडे बघतात. मग रायटर उत्तर देतात. I. O. म्हणजेच तपासी अधिकारी अनभिज्ञ असतो व सर्व उत्तरे हा साहेबाचा रायटर देत असतो. ही अतिशय दुर्दैवाची बाब आहे.

परिणामी बेल अर्जाचे उत्तर तयार करताना, सरकारी वकिलास अपेक्षित असे सहकार्य मिळत नाही. प्रकरणाचा अभ्यास करताना, आपले ॲफिडेव्हीट उत्तर योग्य, व्यवस्थित व नेमके तयार होण्याच्या दृष्टीने सरकारी वकील साहेब आपणास अनेक प्रश्न विचारतात. बरेच प्रश्न हे केस डायरी अथवा चार्जशीट मध्ये असलेल्या माहिती बद्दल असतात. अशा प्रसंगी वेळेचा अपव्यय टाळण्याकरिता तसेच उत्तर योग्य प्रकारे तयार होण्याकरिता काही खबरदाऱ्या घेणे आवश्यक ठरते.

➥ संपूर्ण केसचा / केस डायरीचा / चार्जशीट चा **व्यवस्थीत अभ्यास** करून भेटणे अपेक्षीत आहे.

➥ बेल अप्लीकेशन मधील अर्जदाराविरुध्द, संपूर्ण केसपेपर्स मधील **नेमका जो पुरावा अर्जदाराविरुध्द** बोट दाखवितो तो **नेमका** पुरावा:

(C) Adv. Nahush Khubalkar

- **शोधून ठेवावा**,
- त्यास **flagmark करावे**,
- तसेच वेगळ्या **कोऱ्या कागदावर त्याची नोंद** घ्यावी.

सर्वसामान्य परिस्थितीत आरोपी / बेल अर्जदारा/रां विरुध्दचा **पुरावा** यामध्ये खालील बाबी महत्वाच्या असतात.

⇒ **साक्षीदारांची बयाने / Witness Statements (अर्जदारांविरुध्द बोलणारा / बोलणारे)**

- **कोणता** साक्षीदार अर्जदाराविरुध्द बोलतो आणि
- **नेमके काय** सांगतो ते नोंद करणे.
- आय विटनेस असल्यास त्याने **नेमके काय पाहिले**
- इअर विटनेस असल्यास त्याने **नेमके काय ऐकले**.

⇒ **ईतर पुरावा (अर्जदारांविरुध्द बोलणारा)**

- Spot Panchanama
- Inquest Panchanama
- Injury Report / MLC Report
  - आरोपी चा
  - पिडीत चा
  - साक्षीदार चा
  - त्यात कोणत्या जखमा कोणाला
- Post Mortem Report
  - Injuries
  - Cause of Death

(C) Adv. Nahush Khubalkar

- सेक्शन 27 ची मेमोरॅंडम डिस्कव्हरी / त्यातील seizures
    - कोणापासून?
    - काय जप्त केले?
    - कुठून मिळाले?
    - त्यावर blood वगैरे होते काय
    - ईतर काही नमूद करण्यासारखे

⇒ महत्वाच्या जप्त्या / Seizures
- कपडे
- आरोपी चे
- पिडीत चे
- Blood Sample
- Semen Sample
- Poison
- Kerosene
- Matchbox
- Weapon

⇒ **ईतर....**
- Test Identification Parade
    - कोणी कोणास ओळखले?
- मोबाईल चे Call Details Report (CDR)
    - कोणाच्या मोबाईलचा?
    - त्यावरून काय निष्पन्न होते?

(C) Adv. Nanush Khubalkar

- F I R मध्ये delay असल्यास त्याची कारणे?
- C. A. Reports
- त्यावरून अर्जदाराविरुध्द काय निष्पन्न होते?

⇒ फिर्यादी, आरोपी, पिडीत यांमध्ये कोणाचे कोणाशी कसे **नातेसंबंध** आहेत?

➥ बेल अर्जास **विरोध करण्याची कारणे एकाखाली एक स्पष्टपणे** नमूद करावीत.

➥ या अर्जापूर्वी या अर्जदाराची बेल अप्लिकेशन Reject झाली होती / आहे काय? असल्यास तपशील देणे.

➥ आरोपी विरुद्ध ईतर काही गुन्हे आहेत काय ?

➥ अंतरिम जामिन काळात आरोपीचे वागणे कसे होते? साक्षीदारांना धमकावणे वगैरे प्रकार त्याने केले काय? नवीन गुन्हे केले काय? असे असल्यास त्याचा तपशील देणे.

**वरील माहीतीशिवायही ईतर कोणतीही माहिति महत्वाची वाटत असल्यास ती स्वतःहून ए. पी. पी. साहेबांना पूरविणे अपेक्षित आहे**.

❑❑❑❑❑

(C) Adv. Nahush Khubalkar

# 8

# - अवमान प्रकरणे -
# कंटेम्प्ट ऑफ कोर्ट च्या कारवाई बाबत

आपल्या देशात प्राचीन परंपरेनुसार न्यायदानाचे कार्य हे दैवी कार्य मानल्या गेले आहे. ते कार्य राजा करीत असे. पुढे जाऊन राजेशाही संपुष्टात आली असली तरी, न्यायदानाचे कार्य मात्र संपुष्टात आले नाही.

आजच्या काळात राजा ऐवजी माननीय न्यायमूर्ती व नायाधीश ते कार्य बजावत असतात. “न्यायमूर्ती”, “न्यायाधीश”, “न्यायदेवता” यासारख्या श्रेष्ठ उपमा, न्याय देणारा जो कोणी अधिकारी असेल त्याच्या करिता वापरली जाते. आमच्या न्यायसंस्थेत आम्ही न्यायाधीशाला आजही “माय लॉर्ड”, असे संबोधितो. यावरूनच किती श्रेष्ठ भव्यता आणि दर्जा न्याय प्रक्रियेला आहे याची कल्पना येते.

संविधानाने वसविलेल्या राज्यात जर प्रजेच्या दोन सदस्यांमध्ये, नागरिकांमध्ये वाद असेल तर त्यांनी रस्त्यावर येऊन भांडण्या ऐवजी न्यायालयात जाऊन तो सोडविणे अपेक्षित आहे. एका सिविलाईज्ड समाजाची ती खुण आहे.

अशा परिस्थितीत न्यायालयाने दिलेल्या निर्णयाचे व आदेशाचे पालन आदेशित व्यक्तीकडून झाले नाही तर राज्याचा व संविधानाचा मुळ उद्देश फोल ठरेल. शिवाय न्यायनिर्णय हे केवळ कागदी घोडे बनून राहतील. परिणामी नागरिकांचा न्यायालयावर व

(C) Adv Nahush Khubalkar

न्यायसंस्थेवर विश्वास राहणार नाही. व सगळीकडे अराजकता माजेल. न्यायालयाचा अवमान होईल व न्यायालयाचे महत्व संपुष्टात येईल.

म्हणून न्यायनिवाड्याचे पालन झालेच पाहिजे हा आग्रह आपले संविधान व कायदेप्रणाली करते. कायदा आणि सुव्यवस्था सांभाळणे आणि एक निरोगी सामाजिक वातावरण ठेवण्याच्या दृष्टीने न्यायालयाचे आदेश पाळणे हे बंधनकारक आहे.

हायकोर्टातील अवमान याचिकेची नोटीस मिळाली कि भल्या भल्या अधिकाऱ्यांना घाम फुटतो. झोप उडणे, सतत मानेवर टांगती तलवार असल्यासारखे वाटणे, चिंता वाढणे, मानसिक शांती ढळणे असे प्रकार होतात. हे हायकोर्टात, अधिकाऱ्यांच्या वतीने अवमान याचिका हाताळताना, लेखकाने पाहिले आहे. अवमान प्रकरण ही अधिकाऱ्यांना अतिशय मनस्तापाची बाब ठरते.

असे काय आहे त्यात की ज्यामुळे अवमान प्रकरण इतके तापदायक ठरू शकते.

- *अवमान याचिकेमध्ये अधिकारी **व्यक्तिश:** (ऑफिशियल कॅपॅसिटी मध्ये नाही) पार्टी असतात. त्याचे परिणाम व्यक्तिश: अधिकाऱ्यांवर होणारे असतात.*
- *अवमान याचिका प्रकरणाचे स्वरूप हे अर्ध-फौजदारी म्हणजेच क्वासी क्रिमिनल असते.*
- *अवमान याचिकेची परिणती ही अधिकाऱ्यांस कैदेची शिक्षा किंवा दंड यामध्ये होऊ शकते.*
- *न्यायालयाचे ताशेरे लागून, परिणामी अधिकाऱ्याचा गोपनीय अहवाल खराब होऊ शकतो.*

असा मनस्ताप असा ताप कसा टाळता येईल हे आपण आता पाहणार आहोत.

(C) Adv. Nahush Khubalkar

सर्वप्रथम **न्यायालयाचा अवमान म्हणजे काय** ते आपण थोडक्यात समजून घेऊ या. त्यानंतर अवमानाची कारवाई कशी टाळता येईल ते आपण समजून घेऊ या.

## न्यायालयाचा अवमान म्हणजे काय

कंटेम्प्ट ऑफ कोर्ट कायद्यामध्ये न्यायालयाच्या अवमानाची व्याख्या केली आहे. आपल्या सोयीसाठी त्या दोन्ही व्याख्या खाली सोप्या करून लिहिल्या आहेत. मुळ इंग्रजीतील व्याख्येसाठी कंटेम्प्ट ऑफ कोर्ट अॅक्ट वाचावा.

अवमान दोन प्रकाराचे असू शकतात. पहिला **सिव्हील कंटेम्प्ट** व दुसरा **क्रिमिनल कंटेम्प्ट**. म्हणजेच दिवाणी अवमान व फौजदारी अवमान. [*महत्वाचे असे की कंटेम्प्ट ऑफ कोर्ट च्या कॅटेगरीज ह्या केवळ खाली सांगितलेल्या कंटेम्प्ट ऑफ कोर्ट अॅक्ट मध्ये दिलेल्या व्याख्येपुरतीच मर्यादित नाही. असे असले तरी ती व्याख्या सर्वसाधारण परिस्थिती मध्ये उपयोगी आहेच*.]

व्याख्या :

***दिवाणी अवमान (सिव्हील कंटेम्प्ट)*** *म्हणजे:*

- ***जाणूनबुजून अवज्ञा करणे***

  *एखाद्या न्यायालयाचा कोणताही न्यायनिर्णय, हुकूमनामा, निर्देश, आदेश, रिट, किंवा इतर आदेशिका याचा*

  *किंवा*

- ***जाणूनबुजून भंग*** *करणे*

  *न्यायालयास दिलेल्या एखाद्या अभिवचनाचा (अंडरटेकिंगचा)*

(C) Adv. Nahush Khubalkar

***फौजदारी अवमान (क्रिमिनल कंटेम्प्ट)*** *म्हणजे:*

- ***प्रकाशित करणे***

  *असे कोणतेही मॅटर (साहित्य) [मग ते बोललेल्या अथवा लिहिलेल्या शब्दांनी असो, किंवा चिन्हांनी असो किंवा, दृश्य अशा हावभावांनी असो], <u>अथवा इतर कशाही प्रकारे असो</u>,*

  *किंवा*

- ***अशी कोणतीही कृती करणे***

  ***ज्यामुळे :***

  *१) न्यायालयाचा **दुर्लौकिक** होईल किंवा होऊ शकेल, किंवा न्यायालयाच्या **अधिकारास कमीपणा** येईल किंवा येऊ शकेल.*

  *किंवा*

  *२) कोणत्याही न्यायालयीन प्रकरणास **प्रेजुडीस** होईल किंवा होऊ शकेल अथवा कोणत्याही न्यायालयीन प्रकरणामध्ये **हस्तक्षेप** होईल किंवा होऊ शकेल.*

  *किंवा*

  *३) कोणत्याही प्रकारे न्यायदानाच्या कार्यात **हस्तक्षेप वा अडथळा** होईल किंवा होऊ शकेल*

## <u>कंटेम्प्ट ऑफ कोर्ट ची कारवाई कशी टाळावी</u>

वरील व्याख्येवर जरा व्यवस्थित मनन करा. त्यातच कंटेम्प्ट ऑफ कोर्ट ची कारवाई कशी टाळावी याचे **रहस्य दडले आहे**.

ते कसे हा प्रश्न आपल्याला पडला असू शकतो. तर त्याचे उत्तर सोपे आहे. ते असे.

**वर दिलेल्या व्याख्येमध्ये / वर्णना मध्ये आपली कृती बसणार नाही याची दक्षता घ्या**.

(C) Adv. Nahush Khubalkar

दुसऱ्या शब्दात सांगावयाचे झाले तर असे म्हणता येईल.

- *एखाद्या न्यायालयाचा कोणताही न्यायनिर्णय, हुकूमनामा, निर्देश, आदेश, रिट, किंवा इतर आदेशिका याची* ***जाणूनबुजून अवज्ञा करू नका.***
- *न्यायालयास दिलेल्या एखाद्या अभिवचनाचा (अंडरटेकिंगचा)* ***जाणूनबुजून भंग करू नका.***

***तसेच ज्यामुळे :***

*१) न्यायालयाचा* ***दुर्लौकिक*** *होईल किंवा होऊ शकेल, किंवा न्यायालयाच्या* ***अधिकारास कमीपणा*** *येईल किंवा येऊ शकेल.*

*किंवा*

*२) कोणत्याही* ***न्यायालयीन प्रकरणास प्रेजुडीस*** *होईल किंवा होऊ शकेल अथवा कोणत्याही* ***न्यायालयीन प्रकरणामध्ये हस्तक्षेप*** *होईल किंवा होऊ शकेल.*

*किंवा*

*३) कोणत्याही प्रकारे* ***न्यायदानाच्या कार्यात हस्तक्षेप वा अडथळा*** *होईल किंवा होऊ शकेल*

- ***अशी कोणतीही कृती करू नका***

***वा***

***असे कोणतेही मॅटर (साहित्य)*** *[मग ते बोललेल्या अथवा लिहिलेल्या शब्दांनी असो, किंवा चिंन्हांनी असो किंवा, दृश्य अशा हावभावांनी असो], अथवा इतर कशाही प्रकारे असो,*

- ***प्रकाशित करू नका.***

(C) Adv. Nahush Khubalkar

हे तर झाले निगेटिव्ह शब्दांत.

याला **आणखी सोपे केले** तर **पॉझीटीव्ह शब्दांत** असे म्हणता येईल की

*एखाद्या न्यायालयाचा कोणताही **न्यायनिर्णय, हुकूमनामा, निर्देश, आदेश, रिट, किंवा इतर आदेशिका** याची*

- ***जरूर अंमलबजावणी कराच.***

*न्यायालयास दिलेल्या एखाद्या **अभिवचनाचे (अंडरटेकिंगचे)***

- ***जरूर पालन कराच.***

***तसेच ज्यामुळे :***

*१) न्यायालयाचा **लौकिक** होईल किंवा होऊ शकेल, किंवा न्यायालयाच्या **अधिकाराचा नेहमीच मान** राखल्या जाईल.*

*किंवा*

*३) कोणत्याही प्रकारे न्यायदानाच्या कार्यात **मदतच** होईल किंवा होऊ शकेल*

- ***असेच रास्त वागा***

***व***

- ***अशीच कृती करा***

हे सर्व वेगवेगळ्या पद्धतींनी उहापोह करण्याचा उद्देश हाच आहे

(C) Adv Nahush Khubalkar

की आपल्या कल्पना, कॉंसेप्टस् क्लिष्टता टाळून सुद्धा जास्तीत जास्त स्पष्ट व्हाव्यात.

आता याचा अर्थ असा नाही की आपण न्यायिक कृतींवर **<u>रास्त</u>** टीका करू शकत नाही. कंटेम्प्ट ऑफ कोर्ट ॲक्ट चा सेक्शन 5 आपल्याला तसे करण्याची सूट देतो. पण मग <u>काय रास्त व काय रास्त नाही</u> असे प्रश्न निर्माण होतात. न्यायालयावर करण्यात येणारी टीका ही योग्य व उचित मर्यादेची पातळी ओलांडल्यावर अशी टीका न्यायालयाचा अवमानच ठरतो असे मा. सुप्रीम कोर्टाने एस. आय. अश्विनीकुमार घोष च्या केस मध्ये (AIR 1953 SC 75) मध्ये जाहीर केले आहे. त्यामुळे असे करावयाचेच असेल तर येथे वाचकांना स्पष्ट करण्यात येत आहे की वाचकांनी स्वत:हून कंटेम्प्ट ऑफ कोर्ट ॲक्ट चा सखोल अभ्यास करावा, व स्वत:हून त्याबाबतीत निर्णय घेऊन वागावे, किंवा वकिलाचा सल्ला घ्यावा.

लेखकाच्या अनुभवानुसार, सरकारी अधिकाऱ्यांविरुद्ध ज्या काही कंटेम्प्ट च्या केसेस होतात त्यामध्ये, दिवाणी कंटेम्प्टच्या केसेस जास्त असतात.

**<u>कंटेम्प्ट केसेस होऊ नयेत याकरिता काय खबरदाऱ्या घ्याव्यात</u>**

तेव्हा अशा प्रकारच्या कंटेम्प्ट केसेस होऊ नयेत याकरिता काय खबरदाऱ्या घ्याव्यात ते बघणे उचित ठरेल.

- न्यायालयाचा आदेश प्राप्त झाल्यावर त्याचे बारकाईने अवलोकन करा. शब्दन शब्द वाचा. आणि व्यवस्थित समजून घ्या.

- न्यायालयाने निर्णयाच्या सरतेशेवटी आपणास नेमके काय

(C) Adv. Nahush Khubalkar

आदेशित केले आहे ते चांगले लक्षात घ्या.

- आदेशाचे पालन करण्याकरिता न्यायालयाने काही मुदत दिली आहे काय याची नोंद करा. त्या मुदतीतच आदेशाचे पालन करा.

- न्यायनिर्णयाचे पालन मुदतीतच करा. मुदतीत पालन होऊ शकत नाही असे वाटत असेल तर योग्य ते कारण देऊन न्यायालयाकडे मुदतवाढीचा अर्ज करता येईल. व अशा दिलेल्या मुदतवाढीमध्ये जरूर पालन करा.

- न्यायनिर्णय आपणास मान्य असल्यास ताबडतोब त्याचे पालन करा.

- न्यायनिर्णय आपणास मान्य नसल्यास, आपण त्यास वरील न्यायालयात आव्हान देऊन अंतरिम स्थगिती मिळविणे आवश्यक आहे. केवळ असे प्रकरण वरील न्यायालयात दाखल करणे म्हणजे आपोआप अंतरिम स्थगिती नव्हे. अंतरिम स्थगितीचा आदेश प्रत्यक्षात असणे आवश्यक आहे. त्याशिवाय आपण आदेशाचे पालन करण्यास बाध्य असता.

- आदेशास वरील न्यायालयात आव्हान द्यावयाचे असल्यास वकिलाचा कायदेशीर सल्ला घ्या. आव्हान देणे हे फिजिबल आहे काय ते ठरवा. केवळ वरच्या न्यायालयात अपील चे अथवा रिव्हिजन चे अथवा रिट चे प्रावधान असणे, असा रस्ता

(C) Adv. Nahush Khubalkar

उपलब्ध असणे म्हणून तसे प्रकरण दाखल केलेच पाहिजे असे नसते. त्याची फिजीबिलीटी देखील तपासणे आवश्यक ठरते.

- सर्व विचारांती आपण आदेशास वरील न्यायालयात आव्हान द्यावयाच्या निर्णयाप्रत आले असाल तर हे सर्व वेळ नं दवडता लवकरात लवकर करा. व अंतरिम स्थगिती मिळवा.

## कंटेम्प्ट ची नोटीस मिळाल्यावर

- सर्वप्रथम कंटेम्प्ट पिटीशनचे बारकाईने वाचन करा.

- याचिकाकर्त्याने न्यायालयाच्या अवमानानेबाबत नेमकी काय तक्रार न्यायालयासमोर केली आहे ते समजून घ्या.

- तक्रार बरोबर आहे काय ते तपासा.

- बरोबर असेल तर, म्हणजेच आपण न्यायालयीन आदेशाचे अनवधानाने अथवा चुकून पालन केले नसेल तर ताबडतोब पालन करा.

- अवमान याचिकेमध्ये कधीकधी याचिकाकर्ता, न्यायालयाने मुळ केस मध्ये आदेशित केलेल्या नसलेल्या बाबींबद्दल देखील तक्रार करीत असतो. अशा वेळी तक्रारीचा तो भाग अवमान याचिकेच्या स्कोप मध्ये कायद्याने बसत नसतो. म्हणून अशा वेळी काय करायचे यासाठी वकिलाचा सल्ला घ्या.

(C) Adv. Nahush Khubalkar

- कंटेम्प्ट पिटीशनवर देखील पॅरावाईज कमेंट्स लिखित स्वरूपात द्या . पॅरावाईज कमेंट्स कसे तयार करावे ते या पुस्तकात एका स्वतंत्र प्रकरणात दिले आहे. त्याचा उपयोग करावा.

- आदेश पालन नं करण्यामध्ये आपली चूक असल्यास आपल्या हृदयातून माफी (ॲपॉलॉजी) मागण्याची भावना निघणे अपेक्षित आहे.

- व ती आपल्या उत्तराच्या ॲफिडेव्हीट मध्ये लगेचच, व योग्य अशा शब्दांत व्यक्त होणे आवश्यक आहे.

## माफी (ॲपॉलॉजी) कशी असावी

### हृदयाच्या अंतरंगातून व सच्चेपणाने माफी

उच्च न्यायालयास (व तसे पाहता कुणालाही) मागितली जाणारी माफी ही **हृदयाच्या अंतरंगातून** निघणे आवश्यक आहे. तिच्यात **सच्चेपणा असावा**. व **तसे व्यक्त होणे आवश्यक आहे**. त्यात केवळ दिखाऊपणा किंवा वरवरपणा नको.

वरवरची, केवळ देखाव्याकरिता मागितलेली माफी ही न्यायालय ओळखते.

आता आपल्यातली क्षमा मागण्याची भावना खरोखरी अंतरंगातून आहे हे कशावरून ठरेल ?

प्रसिद्ध विचारवंत इमर्सन म्हणतात “Your actions speak

(C) Adv. Nahush Khubalkar

so loudly, I can not hear what you are saying." म्हणजेच असे की आपले वागणे हे आपल्या शब्दांपेक्षा विसंगत असेल तर ते आपले पितळ उघडे पाडते.

तीच बाब येथेही लागू पडते. आपले वागणे, आपले हावभाव हे काय दर्शवितात? आपले विचार, वाणी, भाव व क्रिया यांमध्ये एकरूपता हवी.

**माफी ही ॲफिडेव्हीट मध्ये उतरताना अतिशय स्पष्ट हवी**. संदिग्ध अथवा अस्पष्ट, व्हेग नको. ॲफिडेव्हीट मधील माफीचा परिच्छेद वाचताना माफीतील सच्चेपणा, स्पष्टपणा, हृदयाची निर्मळता वाचकाला (न्यायमूर्तींना) जाणवायला हवी.

## बेशर्त व ताबडतोब माफी

न्यायालयास मागितलेली माफी ही **हृदयाच्या अंतरंगातून** तर हवीच, शिवाय ती **बेशर्त** देखील हवी. इंग्रजी मध्ये त्याला म्हणतात अनकंडीशनल ॲपॉलॉजी.

तसे पाहता हा फार मोठा विषय आहे. त्याच्या खूप जास्त खोलात नं जाता आपल्या सोयीसाठी काही महत्वाच्या निवाड्यांमधील महत्वाचा भाग उद्धृत करीत आहे. [जिज्ञासू वाचकांनी यासाठी कंटेंम्प्ट ऑफ कोर्ट ॲक्ट 1971 च्या एखाद्या चांगल्या पुस्तकाचा अभ्यास करावा. श्री समरादित्य पाल यांचे लिखित 'लॉ ऑफ कंटेंम्प्ट' हे पुस्तक लेखक सुचवितात.]

मा. कलकत्ता उच्च न्यायालयाने *इन रे हिरेन बोस* च्या केस मध्ये ऑब्झर्व केले:

*"Apology cannot be a weapon of defence forged*

(C) Adv. Nanush Khubalkar

*always to purge the guilty. It is intended to be* ***evidence of real contrition****, **the manly consciousness of a wrong done, of an injury inflicted and the earnest desire to make such reparation as lies in the wrong-doer's power**. Only then is it of any avail in a Court of justice But before it can have that effect,* ***it should be tendered at the earliest possible stage****, not the latest. Even if wisdom dawns only at a later stage, the apology should be tendered unreservedly and unconditionally, before the Judge has indicated the trend of his mind. Unless that is done, not only is the tendered apology robbed of all grace but it ceases to be an apology It ceases to be the full, frank and manly confession of a wrong done, which it is intended to be."*

काही महत्वाच्या निवाड्यांमध्ये मा. सुप्रीम कोर्टाने म्हटले :
*"It is now a settled law that mere tendering of* ***unconditional apology*** *cannot be a weapon of defence to purge the guilty of their offence; nor it is a universal panacea* ***but it depends upon the real contriteness of the alleged contemner****. "*

(C) Adv. Nahush Khubalkar

*T. M. A. Pai Foundation vs. State of Karnataka* AIR 1995 SC 1938 : 1995 (4) SCC 1 मध्ये मा. सुप्रीम कोर्टाने जाहीर केले :

> *"It is equally necessary to erase an impression which appears to be ground that the "**mantra**" of **unconditional apology** is a complete answer to violations and infractions of the orders of this Court".*

## <u>कंटेंम्प्ट मधील बचाव</u>

कंटेंम्प्ट पिटीशन मध्ये काही बचाव देखील उपलब्ध असू शकतात. जसे:

- आदेशाबद्दल माहितीच नसणे;
- अवज्ञा करण्याचा उद्देश नसणे;
- अवज्ञा जाणूनबुजून झालेली नसणे;
- काही परिस्थितीत आदेशाचे पालन करणे अशक्य असणे. वगैरे.

परंतु कोणत्यावेळी कसा बचाव घ्यायचा ते आपण आपल्या वकिलाच्या सल्ल्यानेच करणे शहाणपणाचे होईल.

❑❑❑❑❑

(C) Adv. Nahush Khubalkar

# A great career in LAW awaits you



**Achieve**
**SUCCESS**
**through**
**CLAT**
**(LAW ENTRANCE)**

**FREE COUNSELING BY EXPERTS**
(by appointment)
**TIME: 4 to 6 PM**
**AT: 81, DR. DESHMUKH'S BUNGALOW,**
**CANAL ROAD, RAMDASPETH, NAGPUR**

Arkin
Creating Careers For Lives

**RAMDASPETH**
**NANDANVAN**

**Call: 9921438838**

www.clat.arkin.co.in


**Advertisement.**

## लेखकाविषयी थोडेसे....



**अॅड. नहुष खुबाळकर**

एल. एल. एम. (इंटरनॅशनल लॉ)

- सन 1991 पासून मुंबई उच्च न्यायालय, नागपूर खंडपीठ येथे वकिली व्यवसाय

- सन 2000 पासून असिस्टंट गव्हर्नमेंट प्लीडर व अॅडीशनल पब्लिक प्रॉसिक्युटर या पदांवर मुंबई उच्च न्यायालय, नागपूर खंडपीठ येथे कार्यरत

- आर. टी. एम. नागपूर विद्यापीठाच्या पॅनेलवर वकील; एम. एस. एफ. सी. च्या पॅनेलवर वकील; महा. कौन्सिल ऑफ अॅग्रीकल्चरल एज्युकेशन अँड रिसर्च चे वकील

- नागपूर विद्यापीठाच्या लॉ कॉलेजमध्ये काँट्रीब्युटरी लेक्चरर म्हणून शिकविण्याचा अनुभव

- हायकोर्ट बार असोसिएशन नागपूर च्या 'स्टडी सर्कल कमिटी' चे सदस्य

आपण जर सरकारी अधिकारी, पोलीस अधिकारी, लॉ ऑफिसर, लीगल ऑफिसर असाल; किंवा यापैकी कुणीच नसूनदेखील आपल्या विभागातील न्यायालयीन प्रकरणांचा टेबल सांभाळत असाल; न्यायालयात येण्याची आपली पहिलीच वेळ असेल; आपल्याला जर न्यायालयीन प्रकरणांमध्ये वारंवार न्यायालयामध्ये यावे लागणार असेल; किंवा आपण केवळ एक जिज्ञासू असाल ....

.....तर हे पुस्तक आपल्यासाठी आहे. ते जरूर वाचा.

त्यामध्ये आपल्याला मिळेल :

- *आपले व्हिजन*
- *न्यायालयीन प्रकरणे प्रभावीपणे हाताळण्याकरिता अनेक उपयुक्त प्रॅक्टीकल ॲक्शन स्टेप्स*
- *पॅरावाईज कमेंट्स कसे तयार करावेत याचे मार्गदर्शन*
- *ॲफिडेव्हीट तयार करण्यापूर्वी काय खबरदाऱ्या घ्याव्यात*
- *क्वासी जुडीशियल अधिकार कसे वापरावेत*
- *बेल प्रकरणात सरकारी वकिलास भेटताना काय करावे*
- *कंटेंम्प्ट पिटीशन कसे हाताळावेत*
- *आणि बरेच काही......*

**© 2014 - ॲड. नहुष खुबाळकर**